
।। एक ऐतिहासिक दस्तैवज ।।

# शेतकरी दिण्डी

ना. धों. महानोर



म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २९५०

REFBK-0023753

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

( क्र. मा. प. )
५०००-१२-८२

संदर्भ निबंध (सामाजिक)

2960
23753
निबंध 32425

# शेतकरी दिण्डी

(एक ऐतिहासिक दस्तैवज)

ना. धों. महानोर

REFBK-0023753

नीलकंठ प्रकाशन

किमत
आठ रुपये

प्रकाशक
प्रकाश रानडे
नीलकंठ प्रकाशन
१६४३, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

©
ना. धों. महानोर
पळसखेडे
व्हाया अजिंठा
औरंगाबाद

मुद्रक
शांताराम गोरे
महेंद्र मुद्रणालय
पर्वती
पुणे ४११ ०३०

मुखपृष्ठ / छाया
जयंत जोशी

प्रथमावृत्ती
१८ डिसेंबर १९८२
(ग्रंथाली ग्रंथयात्रा सांगतादिन)

संदर्भ निबंध (सामाजिक)
२९७०
२३८५३
१२।२।८३

महाराष्ट्रातल्या
शेतकऱ्यांना

२९८०
२३७५३
निबंध ३७५२८३

जळगाव

सात। बारा। ऐंशी

पालखीसमोर दणादण पाच-दहा नारळ फोडले गेले अन सबंध आसमंतात पुंडलीका वर दे हारी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय, शेतकरी महाराज की जय, असा एकच जयघोष दणाणून गेला. टाळ-वीणा-मृदंग-अबीर-बुक्क्याच्या, गुलालाच्या गर्दीतून ज्ञानेश्वर माऊली तुकाराम सुरू झालं. पावलं टाकत नाचत नाचत दिण्डी सुरू झाली. महात्मा फुले, शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख अशा प्रतिमा पालखीत. बापूसाहेब काळदाते, एन. डी. पाटील, गणपतराव देशमुख, गोविंदराव आदिक, शरदराव पवार आणखी राजारामबापू पाटील, भाई वैद्य, बबनराव ढाकणे, बापूसाहेब थिटे, अहिल्या रांगणेकर, मृणालताई गोरे अशा कितीतरी शेकडो मंडळींनी पालखी खांद्यावर घेऊन शेतकऱ्यांचा, शेतकऱ्यांच्या मागण्यांचा, शेतीमालाच्या किफायतशीर भावाचा जयघोष सुरू केला. अग्रभागी महात्मा ज्योतीराव फुले ह्यांच्या भव्य तैलचित्राचा चालता बोलता पुतळा,तशीच महात्मा गांधी, पं. जवाहरलाल, डॉ. आंबेडकर ह्यांची अतिशय बोलकी तैलचित्रं. लेझिम, डफ ह्यांच्या तालावर नाचणाऱ्या कुस्तीगीर पहिलवानांचा पहिला जल्लोश. नंतर टाळकरी भजन-कीर्तनवाले. रूप पहाता लोचनी इत्यादीपासून एकनाथी भारूडपासून थेट आजच्या शेतकऱ्याच्या भारुडांपर्यंत शेतकऱ्यांची गाणी, पोवाडे म्हणणारे फडकरी शाहीर. अस्सल खेड्यातले. तरणेबांड. अंगात शेतकऱ्याची दिण्डी. मध्येच सगळ्या देवादिकांचे, फुले – आंबेडकरांचे, तुकारामाचे जयजयकार झाल्यावर शेतीभक्तपरायण शरदबुवा महाराज बारामतीकर की जय केली. नंतर लगेच मठाधिपती राजारामपंत वाळवेकर महाराज की जय असे बऱ्याच मठाधिपती महाराजांचे जयजय झाल्यावर दिण्डीला भलतेच उधाण सुरू झाले.

दहा–वीस–पंचवीस हजाराच्या संख्येने दिण्डीतल्यांना, पहाणारांना सगळे संदेह हरपून नवे तेज, नवी बळकटी आल्यासारखे वाटले. जुन्या जळगावात शेतकरी बहुतांशी जास्ती राहतात. तिथून दिण्डीनं

वळसा घेतला तेव्हा शेतीमालाच्या रास्त किमतीच्या घोषणा. शेतकऱ्याचा जयजयकार करीत, गोविंदराव आदिक, एन. डी. पाटील ह्यांनी मुठी वळवून उंच हात करीत प्रचंड घोषणा दिल्या. तितक्याच मोठ्या प्रमाणात बायका-मुलांमधून, शेतकऱ्यांतून प्रतिसाद येत गेला. श्री विठ्ठल मंदिराजवळ शरद पवारांना आणि सर्व नेत्यांना ओवाळले. शरद पवारांना शेतकऱ्याचा फेटा बांधला. थोरा-मोठ्या शेतकऱ्यांनी मनापासून आशीर्वाद दिले. त्या शेतकऱ्यांची मिठी, भेटणे, ओवाळणे, जळगावबाहेरपर्यंत पोहचवणे, जेवण, चहापान इ. सर्व काही गोष्टी शेतकरी दिण्डीला, त्यांच्या नेत्यांना मूठभर मांस देऊन गेलं. आवाजात दमदारपणा आला. पहिलीच सुरुवात अतिशय घोषणात, दीप्तिमान, नेटकी, योजनाबद्ध आणखी जंगी म्हणावी अशी झाली. आदल्या दिवशीच सायंकाळी सर्व बड्या नेत्यामंडळींची भाषणं प्रचंड मोठ्या सभेत दणकावून झाली होती. तेथेही श्री. पवारांना एक दोन चिठ्ठ्यांतून प्रश्न आल्याने तिची उत्तरे देताना त्यामुळे सभेला अधिकच "थाट" आला होता. (ती फिरकीची गोलंदाजी ग्रेट होती इत्यादी) महाराष्ट्रातील सर्व पक्षांचे नेते, पुढारी, आजी-माजी आमदार, मंत्री, सबंध महाराष्ट्रातील प्रातिनिधिक शेतकरी, शेतमजूर, कृषकसमाजाचे शेतकरी, कोरडवाहू गरीब शेतकरी, बागायतवाले-सर्व जयघोष करीत, शेतीच्या संबंधात जयघोष करीत निघाले. कोणत्याही पक्षाची पताका, नाव इ. नाही. तशी घोषणा नाही. कुठल्याही मोठेपणाचे अंतर माणसात नव्हते. दुतर्फा शेकडो हजारो माणसांची पाहण्यासाठी गर्दी. तो उंचापुरा दिसतोय तो शरद पवार, तरणाबांड गडी हाय. त्यो दुसरा कोण ? राजारामबापू हाय. इत्यादी एकेकाचे -- पहिल्या दिवशी जळगाव ते उमाळा ह्या पहिल्या दुपारच्या जेवणाच्या मुक्कामापर्यंत पूर्ण रस्त्यात मावेना एवढी गर्दी. उमाळ्याला महादेवाच्या मंदिराजवळ नदीच्या किनारी भल्या मोठ्या चिंचेच्या, वडाच्या झाडांखाली वांग्याचे भरीत, पुरी, कांदा असं साधं स्वादिष्ट जेवण ठेवलं. सगळे गावकरी सेवेत. आमदार ईश्वरभाई जैन यांच्या तालुक्यातील गाव.

ईश्वरभाईंचा कामाचा उरक दांडगा. पुढे सायंकाळी नेरीच्या

मुक्कामात त्यांच्याच तालुक्यात. सगळे खूप थकल्याने जेवल्यावर थोडे गाणे, पोवाडा, लोकांपुढे मग सभा, सगळे शेतीचे वाढलेले, खत-बियाणे-अवजारे–इतर खर्च ह्यांचे प्रमाण उत्पादनाशी जुळवून कशासाठी आज आपण हे मागतो आहोत ह्याची जाणीव करून देणारी सर्वांची भाषणे. लोकांच्या, तिथल्या पिकांच्या, शेतीच्या अडचणी इ. गोष्टींवर मग पुन्हा चर्चा. तेही अधिक महत्त्वाचं असं. लगेच दुपारी चार वाजता पुढल्या नेरीच्या प्रवासाला. सायंकाळी सहा वाजता नेरीला दिण्डी पोहचली. त्याआधी एक किलोमिटर अंतराआधीच टाळवीणामृदंग घेऊन एक दोन हजार लोक घ्यायला, स्वागताला वेशीवर आलेले. थकले, भागलेले हळूहळू जमा होऊ दिले. वाडेगावजवळ शरद पवार, गणपतराव देशमुख बाजूच्या एका शेतात बोलत बसले असता काही कुमार वयातली पंचवीस तीस मुलं जवळ आली. त्यांना दिण्डीचं विचारलं. शेतकऱ्यांचं विचारलं. पहिल्यानं ते मोकळं बोलेनात. मग म्हणाले, साहेब आमचं समदं गाव दिण्डीत पुढल्या गावी येईल. काही थेट येऊ. ते रस्ता रोखणं इत्यादी ठीक नव्हतं. लोक त्यामुळे चिडत होते. कामाला खोळंबा होत होता. दिण्डीचे गावातल्या सगळ्या बायांमाणसांना आवडलं. श्री. शरद पवार म्हणाले हे आपल्या शेतकऱ्यांचं म्हणणं. त्यानं नाही ऐकलं तर ? असंच भांडत राहायचं. काही झालं तरी, जेलात गेले तरी बेहत्तर पण शेतकऱ्यांचे प्रश्न तुम्हीच धसास लावू शकता असा खेड्यात भरोसा आहे तुमच्यावर. आम्ही गार झालो. थोडे तजेलदारही झालो. गणपतराव देशमुख, शरदराव पवारांना त्या मुलांनी पुन्हा एकदा विचार करायला लावला. नंतर म्हाताऱ्याकोताऱ्या बायका आल्या. शेतकऱ्याची केविलवाणी अवस्था सांगू लागल्या. अमाप उत्साहात नेरीचा मुक्काम गाठला. --- पहिलाच दिवस. चौदा मैल चालून आल्यानें सगळेच थकले होते. मो. रा. पाटील, अमृतदादा, आर्. एन्. पाटील सर्व जेवण करून सगळे मंडपात जमेल तसे झोपून गेले.

तिकडे सात-आठ हजार लोक खेड्यापाड्याचे मिळून नदीच्या वाळूवर कडाक्याच्या थंडीत सभेसाठी बसलेले. तोपर्यंत आम्ही मग पळसखेडच्या, माझ्या गावच्या तरुण पोरांना – नामदेव सोनने इ. भारुड,

पोवाडे, म्हणायला लावले. डफ-ढोलकीवर शेतकऱ्याची गाणी सुरू झाली. लोक अजून खूष झाले. त्या रात्री फक्त शरदराव पवार व शिवाजीराव शिन्दे बोलले.

नेरी

आठ । बारा । ऐंशी

सकाळी नदीवर, विहिरीवर सकाळचे सर्व विधी मोकळेपणी आटोपून, चहा घेऊन जयघोष करीत जामनेरच्या मार्गावर घोळक्या-घोळक्यांनी गप्पा मारीत गाणी म्हणत, मैल दोन मैल गाणी म्हणत दिण्डी चाललेली. औषधासाठी जीप, पाण्याचा टँकर इ. सोबतीला. शेतावरचे शेतकरी रस्त्यावर भेटत. आलिंगन देत. शेतावरल्या बायका पालखीला नमस्कार करीत. पाच – सहा मैलावर चालत जाताना अंगभर गाण्यांचा संचार असायचा. मी डफ घेतला व शाहीर अमर शेख ह्यांचे गाणे म्हणालो. सगळ्यांनी साथ दिली आणि माझ्यासोबत एन. डी. पाटील, बापूसाहेब काळदाते, गोविंदराव आदिक ह्यांनी झील धरली. राजा मिराशी यांच्या रत्नागिरीकडच्या चाली-वरल्या ठेक्यात फारच धमाल झाली. नंतरच्या ‘ जागा मराठा आम जमाना बदलेगा ’ व अशा कितीतरी गाण्यांमुळे पायावरल्या फोडांचे दुःख हलकं झालं. केकत निंभोरा पळसखेडला लेझीम, ढोल, डफ ह्यांच्या ताफ्याने ईश्वरभाई शरदराव यांना पटके (फेटा) बांधून लांववर केळीचे खांब आणि आंब्याची पानं बांधून स्वागताची खास झलक दाख-विली. एक छोटी सभा झाली. उत्स्फूर्तपणानं दिण्डीला लोकांनी ज्वारीची, रकमेची मदत जाहीर केली. शेनफडू परदेशी आणखी कित्येक हलक्या जमिनीत कमवताना थकलेले तिथले हवालदिल शेतकरी भरतं आल्यागत आम्हाला सर्वांना भेटले. जिवाभावाने, तिथे दिण्डीला खरं स्वरूप येऊ लागलं. कळवळ्यानं लोक बोलू लागले. घाईघाईत एरंडोलचे सभापती आनंदराव पाटील म्हणाले, राजमल पाटील (सरपंच, जामनेर स्पीनिंग मिलचे उपाध्यक्ष व यूथ काँग्रेस (आय) चे अध्यक्ष) चहापानासाठी आग्रह धरत होते. आपल्याला शुभेच्छा देताहेत.

शरदराव व इ. नेतेमंडळी येतील का ? मीच होकार दिला व रस्त्यावरच त्यांचा आदरसत्कार, चहापान स्वीकारलं. शुभेच्छा घेतल्या. आम्ही त्यांच्याकडे शेतकरी म्हणून बोलावलं तर का जाऊ नये ? नंतर सगळयांचंच दिण्डीत रूपान्तर झालं. दृष्ट लागावी इतक्या योजकतेनं, परिश्रमानं, लोकांच्या उत्साहानं जामनेरमध्ये स्वागत झालं. दिण्डीनं पाय ठेवला. दिण्डीच्या अंगावर फुले उधळली. सुवासिनींनी रस्त्यावर पाणी ओतलं. वीस–पंचवीस हजार लोकांची गर्दी घोषणा :

"शेतकरी-शेतमजूर दिण्डीचा विजय असो, शेतमालाला योग्य भाव मिळालेच पाहिजे, शेतमजुराला सात रुपये रोजंदारी मिळालीच पाहिजे."

गोविंदराव आदिक, आणि एन. डी. पाटील अधिक दमदार घोषणा देत. त्यामुळे अजून आसमंत भरून जात होता. श्रीमती प्रभा राव, गोविंदराव वंजारी ह्यांनीही मुठी वळवून आवाज वाढविले. बैलगाडया, ट्रॅक्टर, पायी-पायी जसं जुळेल तसे लोक आले होते. रात्रीच्या सभेला खूप गर्दी होती. श्री. ईश्वरभाईंना जनताचे बारीपासून सगळयाच मंडळींनी, पक्षांनी, शेतकऱ्यांनी साथ दिली. दिण्डीला हुरूप आला. जामनेरच्या केळीच्या सोसायटीनं एकत्र बसून कमी मिळणाऱ्या वॅगन्स, त्यांचे जादा दर, दलाली, ट्रक, इ. डिझेलमुळे न परवडणे अशा मूलभूत प्रश्नांची, केळीच्या त्या भागातील महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा करून बराच कार्यभाग पार पाडला. ही महत्त्वाची नोंद सर्व नेते मंडळींनी घेतली.

बोदवड

नऊ । बारा । ऐंशी

सकाळी सात वाजता निघाल्यावर डोंगराच्या वळणांनी जावं लागलं. रस्त्यात नदीनाल्यावर काहींनी आंघोळी केल्या. दिसतील त्या पिकावर, शेतीवर चर्चा करीत घोळक्या-घोळक्यांनी रस्ता पुढे सरकत चालला. आता पायांना, शरीराला सवय होत चालली होती. प्रत्येक छोटया खेडयावर कमानी दिलेल्या. स्वागत केलेलं. लोक गर्दीनं

आलेले. आपलेपणानं विचारणारे. दुपारी एक वाजता मालदाभाडी या खेड्यावर रस्त्यावरच शेतात ठाणं दिलेलं. जेवण झाल्यावर शेरीवर, डोंगराळ शेतीवर, इकडच्या कष्टकरी शेतकऱ्यांवर चर्चा इ. अजून दुसरीकडे केळी, ऊस. तिथल्या शेतकऱ्यांचं शंकानिरसन. शरद पवारांनी आमच्या पळसखेडच्या भारुडवाल्या पोरांना मल्हारी मार्तण्ड गाणं व एक शेतकऱ्याचा पोवाडा म्हणायला सांगितला. त्यांनी अंगभर नाचून भन्नाट ढोलकी वाजवून म्हटलं. नामदेव सोननें व देवचंद शिनगारे भन्नाट नाचले. तसं सगळ्यांनाच राहवलं नाही. गजाभाऊ बेणी (शाहीर अमरशेख ह्यांचे शिष्य), श्रीरामपूरचे कला पथक ह्यांनी 'तांबड फुटलं, डोंगरी शेत माझं ग' तसेच अण्णाभाऊ साठेंच्या रचना म्हणाले. पुन्हा शेतीच्या गमती, वाईट दिवस, मागण्या, सभा, पल्लेदार भाषणं इ. प्रत्येक ठिकाणी वक्ते बदलते परंतु शरदराव कायम. मालदाभाडीहून दोनचार मैलांवर शेलवडला चहासाठी थांबलो. तिथं एक अतिशय छोटा पण महत्त्वपूर्ण कार्यक्रम घडवून आणला. शे. का. प. चे त्या भागातले एक मोठे कार्यकर्ते प्रतिष्ठित शेतकरी कै. पंडित ह्यांच्या शेतावरील समाधीजवळ थांबून त्यांच्या प्रतिमेचं अनावरण श्री. एन. डी. पाटील ह्यांनी केलं. प्रा. एन. डी. पाटील अतिशय थोडके पण खूप ओलाव्यानं त्यांच्या जुन्या सवंगड्यांच्या आठवणींनं बोलले. एका पायानं अविश्रांत चालणारे दिलीप ढमढेरेपासून एन. डी. गोविंदराव इ. सर्वच आमदारांना फेटे बांधले. दिण्डी सायंकाळी सहा वाजता बोदवडला पोहोचली. रस्त्यावरच नदीत आम्ही अंघोळी केल्या. जवळपासच्या या गावापासून दिण्डीतली संख्या वाढत चालली असल्यानं बोदवडचे सायंकाळचे प्रचंड असं स्वागत पाहून सगळ्यांनाच दुखणं असं कमी वाटू लागलं. दोन-तीन किलोमिटर मिरवणूक चाललेली. आधी सरळ सभा घेतली. सभेला खूप जोराचा प्रतिसाद मिळाला. सभेतल्या लोकांनी उत्स्फूर्तपणे जयजयकार केला.

एनगाव

दहा । बारा । ऐंशी

बोदवडहून पाच-सातशे लोक दिण्डीत वाढले. प्रल्हादभाऊ पाटील, जे. टी. महाजन ह्या सगळ्याच कार्यकर्त्यांना त्यामुळे अधिक हुरूप आला. पुढील गावी सकाळी जाताना प्रत्येक छोटया खेडयावर गावातले सगळे स्वागताला हजर. प्रल्हादभाऊंचा तालुका. मी सकाळी पाच-सहा वाजता निघून आमच्या गावच्या वीस-पंचवीस पोरांसकट अजून इतर पन्नास एक लोक असे पुढे निघालो, रस्त्याने ज्ञानोबा-तुकोबा म्हणत.

वरखेडे गावाजवळच्या नदीतून आम्ही जात असताना बायकांनी धुणी धुणं बंद केलं. विचारपूस केली. आमच्या कचरूबा शिनगारेनं सांगितलं, ' बाई, मला पाच पोरं छोटी-छोटी. सगळी तशीच वाऱ्यावर सोडून दिण्डीत चाललो शेतकऱ्याच्या प्रश्नासाठी. पंधरा एकरात आम्ही सगळे अर्धपोटी, कर्जाऊ आहोत. माझ्याजवळ ती म्हातारी, सत्तरेक वर्षाची सुरकुतलेली आली. पदरानं डोळे पुसले. (द्रोपदीबाई तिचे नाव असावं) ह्या वयात तिला काम करावं लागतं. म्हणाली, तिलाही पाच एकरात दीड क्विंटल कापूस झाला. घरात दहाजण. तिनं आशीर्वाद आम्हाला दिले, ' लेकराबाळात सुखासमाधानानं घरी परत या. ' त्या म्हातारीमुळे पुढे आमचे पाय मंदावले. मागून दिण्डी, दिण्डीचे नेते, आम्ही सगळे एनगांवच्या जवळ गेलो.

दुतर्फा केळीची झाडं, हिरवीगार सजवलेली ज्वारीची ताटं, कांदे तोरणाला. त्यापेक्षा सगळयात कहर म्हणजे ' दोनशे पन्नास ' बायका डोक्यावर पाण्याच्या घागरी घेऊन त्यात भरलेलं पाणी, फुलं, नारळ, इ. शुभशकुनानं स्वागताला आल्या. दुपारची वेळ. दोन तासापासून त्या ताटकळून उत्साहात उभ्याच होत्या. दिण्डीपुढे त्या फुलाच्या पाण्याचा सडा टाकत गावात घेऊन गेल्या. श्री. प्रल्हादभाऊ, श्री. बोंडे यांनी एक नवीनच कल्पना दिली. वेगवेगळ्या खेडयातून, घराघरातून एक भाकर सांगितली. बैलगाडया भरून भाकरी आल्या. आम्ही सर्व सात-आठ हजार लोक जेऊन आठ-दहा हजार भाकरी उरल्या होत्या. भाकरी

मोडायच्या, त्यावर हिरव्या मिरचीची डाळ, कांदा असं साधं पण चविष्ट जेवण झालं. प्रत्येक खेड्यातल्या बाईनं एक भाकरीऐवजी शेतकऱ्यासाठी शरद पवारांच्या नावानं भाकर धाडली, असं त्या नंतर चावळींत होत्या. एकतर "दिण्डी" या शब्दाभोवती, भावनेभोवती महाराष्ट्रात ओलावा, विशेषत: खेड्यातून, त्यात शेतात ह्यावर्षी हा कापसाचा प्रदेश भरडून निघालेला. आणि योग्य वेळी तिथून ही मंडळी जाते आहे. हा सगळाच प्रकार शब्दांपलीकडचा आहे.

एनगावला जळगाव जिल्ह्याची हद्द संपते. विदर्भातील मलकापूरला महत्त्वाच्या कापसाच्या प्रदेशात दोन मैलांवर जायचं. तसा तो सगळा प्रदेश इंदिरा काँग्रेसचा, आणखी थोडा दुरावा असल्यासारखा. शिवाजीराव पाटील (बुलढाणा - माजी मंत्री), आमदार भारत बोंडे, आणखी मलकापूरचे भा. ज. प. चे किसनलाल संचेती, सिंदखेडचे आमदार भास्करराव शिंगणे इ. गळ्यात टाळ घेऊन अभंग गात, गळ्यात गळा घेऊन भेटी घेत आले. अतिशय वाढत्या प्रमाणात पुढे विदर्भात स्वागत. ही आम्हाला सगळ्यांना भारावून टाकणारी गोष्ट. किसनलाल संचेती ह्यांनी सगळ्या दिण्डीला, दिण्डींच्या स्वागताला आलेल्यांना चौफुलीच्या रस्त्यावर दूध दिले. स्वागत केले.

स्वागतापासून तर पुढील राहण्याजेवणाच्या उत्तम व्यवस्थेपर्यंत, सभेच्या मिरवणुकीच्या कार्यक्रमापर्यंत अर्जुनराव वानखेडे, त्यांचे सहकारी संचेती, शिवाजीराव सतत धावाधाव करीत होते. राजारामबापू, एन. डी. पाटील, गोविंदराव, पद्मसिंह पाटील, काळदाते आणखी दिण्डीतील कितीतरी कर्ती माणसे शेतकऱ्यांच्या ह्या उभ्या केलेल्या दिण्डीच्या चळवळीसंबंधी नीटपणानं, धीरानं, आशेनं, शरदराव ह्यांच्याशी मलकापूरपासून जरा आत्मविश्वासानं बोलू लागली. अपेक्षेपेक्षा विदर्भातला प्रतिसाद फार मोठा होता. आणि तो जुळवाजुळव केलेला नव्हता हे स्पष्ट झालं होतं. शेतकऱ्यांच्या कान्याकोपऱ्यातल्या अनोळखी गोष्टी ऐकून आम्ही सुखावलो.

खामगाव

मलकापूरहून सकाळीच सहा वाजता आमचा पहिला भजन-

वाल्यांचा मेळा 'रूप पहाता लोचनी' पासून सगळा तुकाराम म्हणत चालायचा. मग जागे होत बाकीचे येत. पुढे आम्ही एका पाटाच्या चारीवर अंघोळी, कपडे सगळे आटोपून जवळच्या वडने (भोलजीत) शेतीवरील गाणी, पोवाडे सुरू केलं. लोकांनी ओवाळण्या टाकल्या. अगोदरच दिण्डीच्या पालखीत सहज दक्षिणा पडत राहायची. हे आणखी. नवीन लोक उत्साहात होते. तिथे दोघा-तिघांनी कापसाचा ह्या वर्षीचा पीकखर्च सांगितला. ज्वारीचा सांगितला. आम्हीही त्यांना आमचं असेल नसेल ते पीकपाण्याचं सांगितलं. बायकाही जवळ येऊन ऐकू लागल्या. सांगू लागल्या. असं याआधी होत नसे. तिथे मग दिण्डी आली. जेवण, भाषण, चर्चा झाल्यावर पुढील नांदुरा मुक्कामी निघालो इकडे दर ठिकाणी नागपूरला भेट देणारे लोक प्रत्येक गावातून दहा-वीस असायचेच. नांदूरा येथे मलकापूरपेक्षा मोठी सभा झाली. काही नव्या मंडळींना बोलू देण्याचा प्रघात मलकापूर, नांदूरापासून सुरू झाला होता. सर्वार्थानं ते चांगलं होतं. परंतु शरदराव पवारांसाठी ते थांबलेले असायचे. नांदुऱ्याच्या सभेत जळगावच्या पहिल्या सभे-सारखाच पण वेगळा प्रयत्न झाला होता. तुम्ही सत्तेवर असताना का नाही भाव वाढविला ? असे बोलायला सांगून गोंधळ माजविण्याचा प्रयत्न झाला. पण सभेला त्यानंतरच रंग आला. शरदराव पवार ह्यांनी त्यांचे आभार मानून अभिनंदन केलं व त्याचं उत्तर दिलं तेव्हा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. कारणं पटवून दिली. आकडेवारीनं.

नांदुऱ्याहून निघाल्यावर चिखली ह्या छोट्या गावी शेतात आंब्या-च्या सावलीत, केळीच्या बागेजवळ दुपारचं जेवण दिलं. विश्रांती झाली. थोडी गाणी, पोवाडे, कलापथक झालं. पुढे लौकरच खामगावला सहा मैल जायचं म्हणून निघाले. चालण्याची आता सवय झाली होती. श्री. दिलीप ढमढेरे यांच्या पायाला मात्र फार त्रास होत होता. विशेषतः कुबडीमुळे अधिक. त्याला त्या दिवशी मी पूर्ण सोबत दिली. खाम-गावच्या बाहेर आमदार फुंडकर भेटले. जरा तयारी कशी काय पाहून यावे म्हणाले म्हणून गेलो. दिण्डी पाच वाजता वाजत गाजत शह-रात आलेली. शरद पवारांना, सर्व नेत्यांना, दिण्डीला बघायला

अक्षरशः झुंबड लागलेली. गोविंदराव आदिक यांनी राजाभाऊ मिराशी यांना हाती घेऊन जोरदार घोषणा दिल्या. नंतर एन. डी. पाटलांनी. तसं सगळ्यांच्या अंगात आलं. आख्खं खामगाव गजरात बुडालं. सबंध दोन मैल मिरवणूक फुलांनी, मांडवांनी सजविलेली. फुलं उधळीत कॉलेजचे विद्यार्थी-विद्यार्थिनी, शेतकरी, म्हाताऱ्या बायका, सुवासिनी ह्यांनी अफाट गर्दी खामगावात केली.

रस्त्याच्या दोनही कडेला हवेल्या, माड्या, कचेरी कडेकोट लोकांनी-बायकांनी भरलेल्या. दुतर्फा रस्ते तसेच. जळगावला सुरुवात झाली तशीच परिस्थिती, उत्साह, सजावट खामगावला. सगळ्या नेते मंडळींना पटके बांधलेले. सगळ्यांनाच पाहायचं परंतु शरदराव पवारांसाठी लहान-लहान मुलांचीच गर्दी. सगळ्या शेतकऱ्यांची ही गर्दी. ते बोटाने दाखवीत, 'तो शरद पवार'. शरदराव पवार इमारती-वरल्या मंडळींना हात जोडून नमस्कार करीत. शरदराव पवार मुख्य-मंत्री असताना मी कित्येक ठिकाणी त्यांच्या सोबत होतो. खामगावी त्यांचं स्वागत, त्यांच्या निमित्त दिण्डीचं स्वागत हे, ते मुख्यमंत्री होते, त्यापेक्षा मोठं होतं निश्चित ! मध्यंतरी जनशक्तीचे संपादक ब्रिजलाल पाटील ह्यांनी लिहिलेल्या 'मुख्यमंत्री नसलेला मुख्यमंत्री'ची मला आठवण होते व त्याची प्रचिती सगळ्यांना समोरासमोर येते. झाकून काही नाही. खामगावला सरळ सभेच्या ठिकाणी दिण्डी गेली. खूप मोठी जाणती सभा होती. गोविंदराव आदिक, बापूसाहेब काळदाते, बापूसाहेब, राजाराम बापू पाटील, एन. डी. पाटील, त्या दिवशी अधिक विश्वासानं तडाखेबंद बोलले. खामगाव हा पहिला टप्पा होता. तो पूर्णतः यशस्वी झाला होता. खामगावचा कळस होता. त्यामुळेच शरदराव पवार देशाच्या राजकारणावर जरा सविस्तर बोलले. शेतीवरही अधिक खोलवर बोलले. त्याच वेळी व्यासपीठावर डॉ. वा. रा. कोरपे, के. आर. पाटील ह्यांच्या स्वाग-तात त्यांच्या मदतीच्या सामर्थ्याचं बोलताच टाळ्यांचा कडकडाट झाला. दिण्डीत सहज तेरा हजार मिळाले. आणखी झोळीत काही वेगळी रक्कम आली. असं प्रत्येक ठिकाणी होतं. ही साधारण गोष्ट नव्हे. त्यात विदर्भ

हा राज्यकर्त्यांचा बालेकिल्ला.

बापू (राजारामबापू)

या वयातला उत्साह, जिद्द, आपल्या सगळ्यांना लाजवील इतका. ताठपणाचं चालणं, बोलणं. तळपायी फोड आले तरी सहन करून पुढे जाणं. एकदाही थकल्यासारखे नाही. शेवटपर्यंत दिण्डीत पायी चालणार. रस्त्यानं बापूसाहेबांना सांगली-सातार्‍यापासून अलीकडल्या जनताच्या फुटाफुटीपर्यंतच आम्ही मोकळेपणी विचारावं, त्यांनी सांगावं. खामगावच्या सभेत बापू अधिक विस्तारानं जरा खवळूनच बोलले. सबंध प्रवासात मिठ्ठास बोलणं, हसणं, खूप जुन्या मंडळीशी, – तालुक्याला, गावाला त्यांच्या ओळखी, जुन्या आठवणी – ते भेटत राहिले.

बापूसाहेब काळदाते

कमरेतलं दुखणं त्रास देईल असं वाटत होतं तसं झालं नाही. पहिले दोन दिवस मलुल झाले होते. नंतर सावरले. बापूंचं शैलीदार पल्लेदार भाषण ऐकून लोक खूष व्हायचे. टाळ्या घेण्यात बापू वाकबगार. हे नागपूरपर्यंत फक्त नाही. हा लढा इथून पुढे (कायम) अखंड चालणार. हे शेतकर्‍यांचं, खेड्यांचं जनजागरण आहे. लोटूभाऊ फेगडे भेटले. ( जळगाव जिल्ह्याचे – ब्याऐंशी वर्षांचे ) ते समाजवादी मित्र दांडीयात्रेत गांधीजींच्या सोबत होते. आज येता येत नाही म्हणाले. पण बापूंना, शरदरावांना आशीर्वाद दिले. हे छान केलं म्हणालं. महात्मा गांधींची आठवण झाली इत्यादी. असे कोणी साथीदार भेटले म्हणजे बापूसाहेबांना उधाण. टोळक्या - टोळक्यांनी आम्ही चालताना पांचपन्नास तरी असायचो किंवा झाडाखाली शंभरेक. राष्ट्र सेवा दल, संसोपा, प्रसोपा इ. भानगडींपासून कालपरवाच्या मधू लिमये, जॉर्ज इ. मंडळीच्या संबंधातली भूमिका, प्रेम, चीड इ. सर्व काही. मजेशीर. लिहून काढा म्हणालो तर ते म्हणाले की गैरशिस्त आहे.

एन. डी. पाटील

जळगावपासून थेट नागपूरपर्यंत एन. डी. दिण्डीतच राहणार. महात्मा फुले त्यांचा वीक पाईन्ट. त्यानिमित्त पुन्हा ही दिण्डी शेतकर्‍यांच्या प्रश्नावरच. एन. डी. हातखंडा उमेदवार. एकोणविसशे एकोण-

पन्नास (१९४९) पासून कसे हे प्रश्न, हे शेतकरी जीवन आम्ही सोडवू पाहात आहे, कशा शेतीतील चळवळी उभ्या केल्या. इ. सर्व इतिहास आम्ही नुस्ते पंचेचाळीस मिनिटं नव्हे तर, दोन दोन दिवस सुरू ठेवला. एन. डी. फारच आतून सांगतात. शे. का. प. 'मराठ्यां' पुरताच का मानला गेला, शेतकऱ्यापुरताच का राहिला, एवढ्या मोठ्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर पक्ष असा अपयशी दुबळा का राहिला, ह्या माझ्या प्रश्नांची उत्तर त्यांनी दिली. प्रत्येक मुक्कामात वेगवेगळ्या गावांत, दिण्डीत खाजगी व्यासपीठ, ज्ञानसत्र सुरू केलं. कारखानीस, जेधे, मोरे, यशवंतराव मोहितेपासून आजपर्यंतच्या मंडळीचे, शे. का. प. चे प्रताप ऐकले. शेतकरी त्यांच्या घामाने, स्वतः पिकवल्या मालाची किंमत ठरवू शकत नाही. का नाही ? तो काय त्याने चोरून आणला ? हे ठामपणे सांगताना कापूस, ज्वार, ऊस इ. पिकांची कारखान्यातील उत्पादन खर्च, नफ्याची आकडेवारी, बारकावे एन. डी. देतात. जाहीर भाषणातून अधिक पटवून देतात, सांगतात. श्री. एन. डी. पाटलांनी शेतमालाच्या किंमतीचे, तसेच शे. का पक्षाच्या राजकीय इतिहासानिमित्त राजकीय महाराष्ट्राचं पुस्तक (छोटेखानी) लिहायचं कबूल केलं आहे. हाही दिण्डीतला प्रसाद म्हणावा.

गोविंदराव आदिक

दिण्डीमध्ये अतिशय महत्त्वपूर्ण धावपळीची जबाबदारी सर्वच गोविंदरावांच्या खांद्यांवर. बारीक-सारीक सोयीपासून पुढील आखणी कार्यक्रमापर्यन्त. मुठी वळवून गोविंदराव घोषणा देत रस्ताभर दिण्डी जिवंत करतात. सभेत पहिलं भाषण जोरदार हाणल्यावर सभाही जागी होते. वेगवेगळ्या सभेत, गोविंदराव वेगवेगळ्या मुद्द्यांवर बोलले. त्यांच्या सरकारच्या वेळची भूमिका, विशेषतः शेतीची, ठामपणानं मांडत राहिले. माहिती असल्यानं त्या त्या धरणाच्या, बंधाऱ्याच्या, पाटाच्या, शेतीच्या प्रश्नांची आठवण त्या भागात ठेवून त्याला हात घालून बोलले. खामगावच्या सभेत विशेष रंग भरून शेरोशायरीने त्यांनी ती गहिरी केली. त्या दिवशी ते जरुरीही होते. नागपूरपर्यंत गोविंदराव कायम दिण्डीत राहणार आहेत.

शरदराव पवार

'दिण्डी' ह्या सांस्कृतिक शब्दानंच महाराष्ट्रातल्या खेड्यातल्या शेतकऱ्यांना त्याच्या प्रश्नावर योग्य वेळी कवेत घेतलं. शरदराव काळ-जाला हात घालतात म्हणण्यापेक्षा ते प्रश्नाच्या (विशेषत: शेतकऱ्यांच्या) पोटालाच हात घालतात. फार जवळून दिंडीत त्या त्या ठिकाणच्या माणसांना, पिकांना, जमिनीला ओळखणारे. पक्षाचे भेदाभेद लोक त्यांच्याजवळ विसरतात. दिंडीत त्यांचा कळस झाला. कोणाची कुठे काय ताकद आहे त्याबरोबर प्रत्येक कार्यकर्त्याची नीट ओळख शरद-रावांना आहे. व्यवस्थित. त्यामुळे गल्लत होत नाही. रस्त्यानं ज्वारी-मिरची दिसो, पाहणार, त्यावर बोलणार. त्या पिकाचं, विभागाचं विचारणार. दिंडीत कोणी लहानमोठे पाया पडताना चिडणार. त्यांचा उद्घोष करताना कित्येकदा बंद केलं. शेतकरी दिंडीचा विजय असो असे म्हणा. राजाराम बापूंचा, काळदातेचा इ. चा जयघोष स्वत:च करीत. मग दुसरे करीत. प्रामुख्यानं सर्वच भाषणातून शेतीच्या मूलभूत गोष्टी, उत्पादनखर्च, नफा-तोटा, आजची स्थिती पटवून न्याय मागण्यासाठी शांततामय लढा यावर भर सतत राहिला. आपण सर-कारात असताना कसे धोरण होते, स्थिती होती हे सांगणे, पटवून देणे. लहान-मोठ्या खेड्यातल्या, शहरातल्या, कॉलेजातल्या सर्वांना आपले-पणाचे आकर्षण व नाव दिंडीत जवळून पाहायला मिळालं. विदर्भानं पश्चिम महाराष्ट्राचं नेंतृत्व किंवा व्यक्ती, फारशा स्वीकारलेल्या नाहीत किंवा पश्चिम महाराष्ट्रातल्या नेतृत्वाविषयी थोडा परकेपणा, तिरस्कार सतत जाणवला. विदर्भानं शरद पवारांना मात्र अपवाद केलेला दिसतो हा त्यांचा सगळ्यात महत्त्वाचा, जमेचा भाग मानावा लागेल. दिंडीत खूप बारकाईनं ह्या गोष्टी पहाण्यासारख्या काही माण-सांनी मुद्दाम टेहाळून (हाताळून, पडताळून) पाहिलं.

शंभर बैलगाड्या सजवून, कपाशीच्या बैलगाड्या सजवून पुढे काय तर म्हणे घोडे सजवून ह्या शेतकरीराजाचं, दिंडीचं स्वागत अकोला, अमरावती, नागपूरची शेतकरी मंडळी हजारोंच्या संख्येनें अतिशय पोटतिडकीनेसुद्धा करीत असल्याची बातमी पाहून आलेले

सांगताहेत. दिंडी तिकडे निघाली आहे.

तेरा । बारा । ऐंशी
चौदा । बारा । ऐंशी

खामगाव ते बाळापूर, बाळापूर ते अकोला. शेतकरी दिंडीचं खामगावचं देदीप्यमान स्वागत त्यामुळे वाढलेला आत्मविश्वास, शेतकरी समाजातला एकमेकातला वाढत गेलेला जिव्हाळा, त्यामुळे पुढील भजन गाणी-चालणं-बोलणं ह्या सगळ्याच गोष्टीत अधिक जोर आला. सभा आणखी प्रभावी होऊ लागल्या. खामगावहून ह्या नऊ मैलांवरल्या गावी दुपारी जेवण व विश्रांती झाली. कीलोरीहून जेवण व मुक्काम झाला. इथं दिंडीला, दिंडीकऱ्यांना विरोध जाणवत होता. गावं छोटी पण हे जाणवत होतं. तरी पण स्पष्टपणानं विरोधी कोणी बोललं नाही. स्वागत, आदरातिथ्य थंडपणानं झालं. डॉ. तिरुख, श्री. के. एस्. राठोड, भोळे ह्यांनी तरीही सर्व व्यवस्था चोख केली. सोय राखली. दुसऱ्या दिवशी बाळापूरहून व्याळा ह्या गावी जेवण व विश्रांती झाली. मला पटकन लक्षात आलं, गेल्या आठदहा वर्षातील नव्या कवींमधे कविता लिहिणारे एक चांगले कवी वसंत वाहोकर ह्या गावचे. पुन्हा त्यानिमित्त नव्या कविता, कवी यांची उजळणी. विदर्भाचे नवे कवी इत्यादी. व्याळा व अकोला पुन्हा आठ मैल. सायंकाळी अकोला येथे ह्या सगळ्या गोष्टींची कसर काढावी म्हणून की काय फार भव्य असं स्वागत अकोल्यात झालं. शंभर बैलजोड्या रंगरंगोटी, झूल इ. नं सजवून शेतकऱ्यांनी गाडीजोडीनं स्वागत केलं. पन्नाससाठ हजारांच्या पुढील मंडळी बाहेर स्वागताला आली होती. कित्येक सुवासिनी ओवाळायला आल्या. म्हाताऱ्या-कोताऱ्या बायका दिंडीच्या दर्शनाला आल्या. तरुणांमधला उत्साह सबंध दिंडीकरांना, शहराला व्यापून होता. कापूस उत्पादक संघाचे डॉ. कोरपे आणखी त्यांचे सर्व सहकारी महत्त्वाचे जाणते लोक ह्या स्वागताला, रात्रीच्या सभेला, सर्व प्रकारच्या व्यवस्थेला नीटपणे हाताळीत होते.

डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठाचे तरुण विद्यार्थी त्यांच्या प्रश्नां-संबंधी, शेतीविषयक प्रश्नांसंबंधी, दिंडीच्या चळवळीसंबंधी अधिक नेटानं आस्थेवाईकपणानं भेटले. तिथून सामील झाले. त्यामुळे वेगवेगळ्या क्षेत्रा-तील विद्यार्थी व इतर लोक आपोआप वाढत चालले. वऱ्हाडचे कवी, आमचे मराठीचे नव्या दमाचे कवी गीतकार विठ्ठल वाघ, ' देवकीनंदन गोपाला ' चित्रपटाचे डॅडी देशमुख दिंडीत फारच उत्साहानं तन्मयतेनं एक झाले. तिथून पुढे त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांनी नागपूरपर्यंत दिंडीची पताका खांद्यावर घेतली. विठ्ठल वाघांनी कविता-गाणी, शेतकऱ्यांची गाणी स्वतः लिहून म्हणून दिंडीत अधिक रंग आणला. शरदराव पवार विरोधी पक्षनेते. अधिवेशन सुरू होत आहे म्हणून नागपूरकडे गेलेले. रोज तिकडे कामकाजासाठीअन्य संपर्क साधण्यासाठी जायचं. सायंकाळी भरधाव येऊन पुन्हा दिंडीत व रात्रीच्या सभेत, भेटीगाठीत, विचार-विनिमयात सामील व्हायचं. बाकी सर्व नेते मंडळी दिंडीसोबत कायम होती.

पंधरा । बारा । ऐंशी
सोळा । बारा । ऐंशी

अकोला ते बोरगाव मंजू. बोरगाव ते मूर्तिजापूर. अकोल्यानंतर बाभूळगाव येथे भोजन, विश्रांती झाली. तिथून पुढे बोरगाव मंजूपर्यंत मुक्काम होता. रस्त्यानं दिण्डीकरी शेतकरी भारी काळीच्या सुपीक जमिनीचा पोत, वेगवेगळ्या जातीच्या कपाशीची पिकं, जळगाव धुळ्या-सारखी एकशे सत्त्याण्णव जातीची कपाशी इकडे पेरली पाहिजे, एकशे सत्तेचाळीस किंवा वरलक्ष्मी एस्. आर. टी सारख्या जाती असूनही एकरी उत्पादन असं फारसं दिसत नाही याचं कारण काय, कमी विहिरी, कमी बागायती ह्यावर आमचं खूप बोलणं रस्त्यानं शेती पाह-ताना चाले. हंगामी विहिरीचा वापर का करू शकत नाही. पाणी कमी असलं तरी ? वसंतरावजी नाईक, तपाच्या जवळपास ह्या भागाचे असलेले शेतकऱ्यांचे खंदे पुरस्कर्ते, मुख्यमंत्री होते. भाजीपाला, बागायती कुठे कोरवी, मिरची, वांगी इ. दिसली म्हणजे मदन भोसले, आम्ही

त्यावर बारकाईनं पाहून त्या शेतकऱ्याशी बोलायचो. कुठे थोडीफार संत्र्याची नवी लागण दिसायची तीही दोनशे-पाचशे झाडांची. वरुड, पोशी, सेंदुर्जनाघाट, काटोल, कळमेश्वरच्या जवळपासही बरोबरीत जाणारी नाही. केवढं अंतर! भर काळला जमिनीचा प्रदेश पण ओका-बोका वाटायचा. कपाशीचा हंगाम संपून चाललेला. कपाशीचीही ताकद कमी दिसत होती. छोटी छोटी पऱ्हाटी. कपाशी 'बोंड कपाशीचं डुले' ह्या मर्ढेकरांच्या कवितेच्या ओळी मग मी म्हणायचो. तिथला शेतकरी खूष. दिण्डीकरी खूष. मग त्या शेतकऱ्यांशी आम्ही बोलायचो, बोरगाव मंजू हे छोटं गाव. तिकडे शेती अधिक दिसली. फारसं कोणी स्वागताला आलं नाही. बाहेरच्या शाळेत मुक्काम ठोकला. अकोल्याहूनच तिथं सर्व व्यवस्था केली गेली.

बोरगावमंजू ते कोटपूर्णा. दुसऱ्या दिवशी सात मैल. परंतु मुद्दाम अकोल्याहून दिण्डीत आलेल्या भाविकांनी गाणी, भजन, कविता, किस्से इ. खास वऱ्हाडी रसायन रस्त्यानं गटागटानं सुरू केल्यानं पटकन गाव आलं. डॅडी देशमुखांनी 'देवकीनंदन गोपाला' चित्र-पटातील गाडगे महाराजांची भूमिका करतानाची डॉ. श्रीराम लागूंची त्या वेळची सर्व कथा उजळणी केली– डॉ. लागू डिट्टो गाडगे महाराज होऊन रस्त्यावर गावोगावी-कीर्तनात-त्यांचे चित्रीकरण करताना किती-ही अडविले तरी हजारो स्त्री-पुरुष त्यांच्या पायाला वंदन केल्याशिवाय हलत नव्हते. सर्व साक्षात चालल्यासारखं. असं हजार गोष्टींचं पोतडं. रात्री मूर्तिजापूरला मुक्काम. जेवण, जाहीर सभा, मूर्तिजापूरला दिण्डीत बाबा आढाव आलेले. त्यामुळे अजून नवं चैतन्य. गोविंदराव आदिक, काळदाते, एन्. डी., राजारामबापू रोज कायम होतेच. परंतु नवीन मोठी व्यक्ती किंवा त्या त्या ठिकाणची माणसं ऐकण्यासाठी दिण्डीकरी उत्सुक असायचे. त्यांना अधिक वेळ दिला जात होता.

बाबा आढाव भजन-पोवाडे झाल्यानंतर मनःपूर्वक बोलले. समता संगर, समतेचं सूत्र, तत्त्वज्ञान, देशातील त्या संबंधातील जटिल व्यवस्था, महात्मा ज्योतिराव फुले, त्यांचं एकूणच जीवनकार्य, विशेषतः विचार ह्यासंबंधी व्यवस्थितपणानं आपले विचार मांडले. नामांतराच्या

संबंधी त्यांची भूमिका, नामांतराचा प्रश्न व त्यामुळे निर्माण झालेला सामाजिक तणावाचा प्रश्न ह्या सगळ्या गोष्टी बाबांनी मांडल्या. दिण्डी-विषयी, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंबंधी मनःपूर्वक आवाहन केलं. ज्योतिराव फुलेंसंबंधी अगोदर आधिक्यानं सभेत भाषणं झाल्यानं एन्. डी. पाटील फार खूष होते. कारण त्यांचंही ते आद्यदैवत. वीकपॉईंट. त्यामुळे रात्री न झोपता, न थकवा वाटता फार्मात येऊन आमच्या गटात जोरदार गप्पा मारायला बसले. खेर मंत्रिमंडळ, वैकुंठभाई मेहता इ. संबंधी तसेच आर्. के. खाडिलकर-शंकरराव मोरे ह्या त्यांच्या भाषेत लिक्विडेटेड कंपनी-संबंधी त्या वेळचे अत्यंत महत्त्वपूर्ण ऐतिहासिक तारीख-घटनांसकट सांगत बसले. अशा अनेक रात्री. थकवा प्रचंड असला तरी रात्री असल्या जागरणात निघून जात. कुणाच्यान् कुणाच्या बोलण्या-सांगण्यातून, चर्चे-तून फार मोठं वैचारिक राजकीय, सामाजिक असं प्रबोधन दिण्डीत सहज होतं.

सतरा । बारा । ऐंशी

अठरा । बारा । ऐंशी

मूर्तिजापूर ते मधापुरी, ते अमरावती. छोटा कुसुंबागाव ओलां-डला. माना ह्या गावी पुढे भोजन-विश्रांती घेतली. मध्यभागी राजरस्ता विस्तीर्ण. भरकाळीची चिकण मातीची जमीन. अनिलांच्या दशपदीतल्या कवितेतली. फक्त कपाशीचं पीक. इतर पिकं फारच थोडी. कपाशीची पांढरी शुभ्र चमचम चांदी. विहिरी कमी. मी व आणखी माझ्यासारखे बागायती जमिनीवर प्रेम असणारे लोक तिथे चिडचिडत. खिन्न होत. पश्चिम महाराष्ट्र व जळगावपेक्षा प्रयत्न कमी. धडपड कमी. मराठ-वाड्यासारखी. अमरावतीच्या जवळपास थोडी संत्राबागायती वाढलेली वाटली. त्यातही मेहनतीचे बगीचे कमीच आढळले. आमच्याकडचे त्यांना सांगितलं तर पटेना. माना ह्या गावी अपूर्व स्वागत झालं. त्यांच्या-परी गुळाचा चहा दिला. त्यात खूप गोडवा व जिव्हाळा होता. बायका-माणसं, लहान चिल्लीपिल्ली पोरं, लेझीमवर ढोलकीवर नाचत.

दिण्डी जयजयकार करी. शेवडे व भोळे ह्यांनी पुढल्या टप्प्यात दूध प्यायला दिलं. कित्येक लोक दिण्डीत सामील झाले. कुठे कमी होत. जवळपासच्या गावचे असल्यास जाऊन दोन दिवसांत पुन्हा येत. काही असे शेवटपर्यंतसाठी पुढे वाढत राहिले. दूध दिलं तिथं जवळपास पंचाहत्तर माणसांनी भजन गाणी म्हटली.

नानासाहेब गोरे दिण्डीत सामील झाले. सर्व दिण्डीकऱ्यांनी त्यांचा जयघोष केला. एक नवा संचार पुन्हा आला. दिण्डीचं प्रचंड स्वागत गावोगावी झालं. अरुण मेहता ह्यांनी पंधरा-वीस गाणी रस्त्यानं एका दमात अतिशय चांगली म्हटली. नानासाहेब आलेले. दिण्डीत चालताना पुन्हा साथीदारांनी राष्ट्र सेवा दलाची सर्व जुनी गाणी नव्यानं म्हटली. अरुण मेहतानं पुन्हा वहीतली गाणी काढली, आणखी दिण्डी कवितामय छंदमय झिंगत राहिली. नानासाहेब गोरे ह्यांनी सविस्तर भाषण करून सगळ्यांना पुन्हा जागं केलं. नवे दिण्डीकरी आमच्यात अधिक होते. ही शेतकऱ्यांची दिण्डी महात्माजींच्या दांडीयात्रेपेक्षा महान आहे. दांडीयात्रेत दोनशेपन्नास तीनशे लोक होते. पन्नाससाठ निवडक माणसं होती. निवडक ठळक महत्त्वाच्या माणसांची दाण्डीयात्रा सत्याग्रह होता. फार महत्त्वाचा होता. ही दिण्डी तशी जनसामान्यांची. पायात वहाण नसलेल्यांपासून पोर विकलेल्या माणसांची आहे. अडाणी, कर्जबाजारी शेतकऱ्यांची, मजुरांची आहे. सामाजिक न्याय, आर्थिक बाजू जरूर आहे. राजकीय बाजूही ह्याला जरूर आहे. परन्तु आमच्या न्यायासाठीच हा झगडा आहे. शेतकऱ्यांना एकत्रितपणे आलेली ही जाग आहे. त्याला मोडून टाकले जात आहे त्यावेळी आलेली ही जाग आहे. नानासाहेबांनी त्यांच्या पद्धतीनं हे अत्यंत प्रभावी पद्धतीनं आतून मांडलं. लोक भारावले. आदल्या दिवशी मधापुरीऐवजी कुरूम ह्या गावी मुक्काम झाला होता. त्या दिवशी टेकाडावर झाड नाही. सर्वत्र सुन्नाट. उन्हात जेवण घेतलं होतं. दिण्डीत कुणालाही चुकूनही एखाद्या ठिकाणच्या गैरसोयीची खन्त नव्हती.

एकदा बैठक, गप्पा रंगल्या म्हणजे कुठल्याही. सिंहासनच्या चित्रीकरणाच्या वेळी डॉ. लागूंशी मला खूप बोलता आलं. त्यांनी ह्या

भागातल्या माणसांचं, त्या देवकीनंदन गोपालाचं, त्या प्रभावी शक्तीचं, 'मास' मध्ये असलेल्या त्यांच्या बांधिकीचं बोललेलं होतं. आठवणी आल्या. प्रदेश, लोक भेटले तेव्हा मी लोकांना ते सांगितलं. मधेच त्या वेळी शिवाजीराव गिरिधर पाटील भेटले. दिण्डीत आले. आम्ही मुद्दाम ताजा चालू असलेला वृत्तपत्रातील महात्मा गांधींच्या चित्रपटाचा विषय काढला.इतरही पुष्कळ.त्यानिमित्तानं त्यातल्या भूमिकेसंबंधी स्मिताचं ठरलं की रोहिणी हट्टंगडी.काही वाही काढून त्यांना बोलतं केलं. नवीन काही ऐकण्यासाठी. दिण्डीत असं पुष्कळ आपोआप येत असे. शिवाजीरावांनी आज कुठला केसरीचा अंक मला दिला. मराठवाडयातील कवींचा विशेषांक. शिवाजीराव म्हणाले, किती आडनावं. कुठल्या खेडयापाडयातले लोक नव्यानं सुंदर कविता लिहितात इत्यादी. हे फोटो निष्कारण छापले. कुठल्या कुठल्या समाजातून, खेडयातून लिहिताहेत ही ग्रेट गोष्ट आहे यावर आमचं मस्त चाललं. दुसरा एक केसरीचा अंक त्यांनी दिला. त्यात माझ्यावरच चिडून अग्रलेख. 'महानोरांचा दिण्डीतला डफ' असं काहीतरी अग्रलेखाचं नाव. आम्हाला वाईट वाटलंच नाही. उलट हे फार ग्रेट वाटलं. ह्या जनसामान्यांच्या समुद्रापुढे, शेतकऱ्यांपुढे केसरीतलं लिहिणं फार मुर्दाड वाटलं लोकांना. त्यावरच मग चेष्टा, चर्चा, मजा. लोक म्हणाले, तू आता एकदा टिळकांवर वा केसरीवर कविता लिहिलीच पाहिजे. दिण्डी अशी सर्व गोष्टींना व्यापून चाललेली. एक नवं जागरण. सर्व गोष्टींचं. मधेच कोणा आमच्या शेजारच्या दुसऱ्या गटात लिबिया, शत्रुराष्ट्र, आसाम इत्यादि तर काही स्मॉल स्केल इंडस्ट्रीज आणखी त्या संबंधातील सरकारची भूमिका, व्यवस्था इत्यादि प्रश्न घेऊन बसलेले. श्रीमंत-गरीब, जात-पात, धर्मभेद, पक्ष इत्यादि विसरून नव्या खऱ्या सामाजिक समतेच्या राज्यात शेतातल्या मुक्कामाच्या ठिकाणी होते हे असे. मधल्या मधापुरी लोपी गावानजिक त्या त्या गावी खेडोपाडी साधारण स्वागत झालं. पस्तीस टक्के मुस्लीम वस्ती. इतर आणखी काही महत्त्वाच्या सरकारातल्या माणसांचे त्या त्या ठिकाणचे हितसंबंध, प्रचंड दबाव. हे दहा-पंधरा मैल साधारण गेले. रुखे गेले.

लोक चालत राहिले. दिण्डीचा आजचा प्रवास म्हणजे सर्वात लांबचा म्हणजे चोवीस मैलांचा. सगळे मलूल झालेले, खूप थकलेले. अमरावतीजवळ पोहोचले तेव्हा कुणाच्याही शरीरात, पायात त्राण नव्हता. सुन्न. पायातले फोड, धूळ, थकवा, मरगळ, दु:ख सगळं संपून जावं इतकं जबरदस्त स्वागत अमरावतीला झालं. जामनेरला आम्ही भारावलो. त्यानंतर खामगावला. अकोल्याच्या सजवलेल्या बैलजोडींच्या स्वागतानंही हद्द गाठली होती. अमरावतीला कळस झाला. पंधरा-वीस अतिशय उंचेपुरे, सतेज, अरबी घोडे सजवून स्वागताला सामोरे. नंतर लेझीम, ढोल. नेहमीचं सगळं स्वागत. त्यात नवल विशेष नव्हतं. शरदराव पवार नागपूरहून येऊन अमरावतीच्या मिरवणुकीला दिण्डीत सामील झाले होते. लाख दीड लाख लोक प्रचंड गर्दीनं सतत तीन किलोमीटर अंतर व्यापून रस्ताभर होते. सत्तर टक्के तरुणांचा भरणा. पोलीस यंत्रणा वा कुणाच्याही हातचे काही राहिले नव्हते. जमिनीवर पाय ठेवणं, पाय पुढे टाकणं कठीण इतकी गर्दी (लोकमतनं कमीतकमी सत्तर हजार लोक लिहिले. त्यापेक्षा प्रतिनिधी कमी लिहू शकत नाही असं म्हणाला, तर त्यावर सत्ताधारी रागावले.) अंगात आल्यागत धुमाकूळ, घोषणा, मिरवणूक. राजरस्ते चौफेर हवेल्या माड्या बुरुज नुस्त्या बायका-माणसांनी भरगच्च. तिथून फुलं-हार फेकणं, हात जोडणं. स्वागतापासून तब्बल दोन तासानं मिरणूक सभेच्या ठिकाणी पोहोचली. पुष्कळ धावूनही सर्व नेते मंडळीच्या अंगभर मूठभर मांस वाढलं. विदर्भानं, नव्या पिढीनं, शरद तसरे आणखी त्यांच्या शेकडो हजारो साथीदारांनी शेतीविषयक प्रश्नावर एवढं जागरुक बेधडक असावं याचं नवल वाटलं. नुस्तं स्वागत नाही, व्यवस्था जेवणखाण, राहणं, सभा हजाराचं संपून आता लाखाचं सुरू झालं. लाख-दीड लाख लोक होते असं सर्व वृत्तपत्रांनी दिलं. लाखाची सभा सुरू झाली. सभेत राजाराम बापू पाटील, एन्. डी. बोलले. तिकडचे आमदार सुदाम देशमुख ह्यांनी धमाल लोकप्रिय बंबार्ड भाषण ठोकून सभा अंगावर घेतली. शरदराव ह्यांनी नेंहमीचं भाषण बदलून आज फारच फॉर्मात नवे मुद्दे काढले. सभा भन्नाट झाली.

शरदराव आमच्यात नंतर खासगीत म्हणाले, मी नेहरूंमुळे प्रभावित झालो होतो. पण माझं अपील हा खेड्यांचा गरिबांचा देश, सामान्य मोडक्या माणसांचा देश. महात्मा गांधी यांचे विचार, त्यांचा मोठेपणा तत्त्वज्ञान आज मला खऱ्या अर्थानं ह्या वेगवेगळ्या रूपानं, प्रसंगानं दिसत आहे. शरद तसरे, प्रमोद वानखेडे, प्रमोद काळे आणखी त्यांचे साथीदार, सवंगडी, नगराध्यक्ष हरीभाऊ कलोती (दुर्दैवानं नंतर दोनच दिवसांनी ते वारले.), सौ. कमलाबाई गवई ह्या सर्व मंडळींनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी जिवाचं रान केलं. सर्व काही दिण्डीमय झालं होतं. सर्वांना अभिमान वाटावा, डोळ्यात कायम राहावा असा अमरावतीचा क्षण होता. स्वागत होतं. शब्दांपलीकडलं. खरं म्हणजे हेच दिव्यभव्य स्वागत, त्यातून दिसणारी शक्तीच नडली. सरकारी चाकं चक्रावली.

एकोणीस । बारा । ऐंशी

अमरावती तें पोहरा मुक्काम. पोहरा तें चांदूर रेल्वे. अमरावतीला सायंकाळी सात वाजता शरद तसरे, जरूडचे हर्षवर्धन हसमुख व त्यांची तरुण मित्रमंडळी, गावातील बहुसंख्य लोक निरोप द्यायला सोबत आले, दूरवर पोहऱ्यापर्यंत. अमरावतीच्या स्वागताचा उत्साह दिण्डीमधल्या वातावरणात दिसून आला. आजूबाजूच्या खेड्यातूनही दिसला. पोहरा ह्या छोट्या गावचा टप्पा व मुक्कामही. त्यामुळे दिण्डीकरी खूष होते. फक्त तेरा किलोमीटर चालणे. कालचा थकवा आज निघून जाणार. आज दिण्डीत अमरावतीपासून जॉर्ज फर्नांडिस होते. रस्त्यानं पोहऱ्यापर्यंत डोंगराचा, झाडांचा चढ-उताराचा रस्ता, वळणावळणाचा. नदीनाले, ओहळ, पाणी, झाडेगर्दी त्यामुळे आम्ही खूष. रस्त्यात पाच किलोमीटर अंतरावर आम्हाला आदिवासी बायकामाणसांनी अतिशय गरीब झोपड्यात दूध प्यायला दिलं. तिथून पुढे पोहऱ्यापर्यंत मी व माझ्या पाच सात दोस्त मंडळींनी जॉर्जला सोडलं नाही. देशपरदेशच्या भानगडी. आज दिल्लीचं, देशातलं, उत्तर प्रदेशचं जीवन-सगळं काही विचारलं. डी. कास्टासंबंधी बोललो. जॉर्ज फारच उमदा साधा ग्रेट माणूस

वाटला. झपाटून टाकलं आहे आजही. मधल्या गदारोळानंतरही जॉर्ज आपण केलेल्या अनेक गोष्टींवर चर्चा करताना फारफार खूष होते.

आदिवासी स्त्रिया आमच्या दिण्डीत येऊ लागल्या. आम्ही त्यांचं स्वागत केलं. दिण्डीत अधूनमधून काही खेड्यापर्यंत स्त्रिया येत काही संपूर्ण दिण्डीत होत्या. भाडलीच्या यशोदाबाई कोळी, चमेली कोळी तसेच जालन्याच्या स्वातंत्र्यसैनिक दगडाबाई शेळके होत्या. अलका देसाई, गोदाताई परुळेकर, शहाबाई ह्यांच्या सोबत शेकडो स्त्रिया आल्या होत्या. अहिल्याताई रांगणेकर, ओझाबाई अशी कितीतरी नावं. अदिवासी स्त्रिया काही पुढल्या आदिवासी पोहरापर्यंत व पुढेही येणाऱ्या होत्या. पोहरा हे छोटसं आदिवासी खेडं. बंजारा मुलांनी आदिवासी वेषात नृत्य-लेजीम खेळून आमचं आगळं स्वागत केलं. आदिवासी बायकांनी सर्वांना ओवाळलं. हार घातले. एका मोकळ्या शेतात मंडप दिले होते. दगडाधोंड्यांचं टेकाडावरलं शेत. जेवण तयार होतं. त्याआधी आमच्या पोरांनी नामदेव सोनने, देवचंद मारुती पिसे ह्यांनी अफलातून भारुडं म्हटली. नवी, जुनी. वातावरण तयार झालं. शिंदे, एन्. डी. पाटील आणि मी त्या दिवशी थोडक्यात बोललो. सबंध वेळ जॉर्ज फर्नांडिस ह्यांना दिला. दिण्डीकरी शेतकरी आदिवासी समाज. त्यामुळे मी जरा साशंक होतो. जॉर्ज ह्यांनी जनता अक्षरशः कवेत घेतली. पूर्णपणे जॉर्जच्या काबूत. अशी भाषणाची भट्टी, बाज जुळून आला होता. जॉर्ज एका तासापेक्षा अधिक बोलले. तन्मयतेनं शेतीच्या बारीकसारीक पिकांची, प्रश्नांची, १८ एकराच्या जमिनीच्या कमालधारणेच्या उत्पादनाच्या कायद्याची, मर्यादांची, टाटाबिर्लाच्या अमर्याद संपत्तीची सांगड सांगून पाहिली. तफावत दिली. दोघांतली तफावत. कायदा. वीसतीस वर्षांची स्थिती. आजची. उत्तर प्रदेशातल्या ह्या प्रश्नांवरील लढण्याची स्थिती. विचारसरणी व त्यातही वसंतरावदादा पाटील इत्यादी योग्य शेतीमाल भाव खर्चाच्या आधारे मिळाले पाहिजे सांगणारे – वळशानं पाठिंबा देणारे – न देणारे सर्व एकूण दिण्डीचं फारच पटवून सांगितलं. बटाटावेफर व इतर माल ह्यांची उदाहरणं आकडेवारीनं देऊन पटवलं.

अस्सल मराठीत जॉर्ज जिवाच्या आकान्तानं बोलले. तीच एकोणवीसशे सत्तावन्नची वज्रमूठ, तीच डरकाळी, तेच आव्हान जॉर्जमधे संचारलेलं सर्वांनी पाहिलं. खूप अभ्यास करून जॉर्ज आले होते व त्या त्या प्रश्नांवर मनापासून अनेक खासगी बैठकीत, रस्त्यानं बोलतच राहिले होते. आग्रह करता पुन्हा दोन-तीन दिवसांनी दिण्डीत येण्याचं व कायम सव्वीसपर्यंत राहण्याचं कबूल करून गेले. पोळी, बटाटे-वांगी ह्यांची रस्सेदार भाजी, कांदा असं मस्तपैकी जेवण झालं. चार वाजता गटागटांनी झोपणं, गप्पा मारणं, गाणं. मुक्काम तिथंच होता. पुन्हा रात्री न थकता चालणं जेवण. अधिवेशन दोन तारखेहून सव्वीस तारखेवर मागे आल्यानं तीन दिवसांच्या प्रवासाचं काय ? कसं होणार ? इ. चर्चा. आमच्या गावीची भारूडवाली मुलं जवळ आली. गप्पा सुरू झाल्या. कालपासून मुंबईची ती लालटोपीवाली मुलं, त्यांच्या सोबतचे दोनेकशे लोक व इतर काही लोक प्रल्हादराव कुरणेसाहेब दिसत नाहीत असं विचारलं. ते शहरातले. थकले असतील. आपल्याला लबाडी करून बसनं येतील व पुढील टप्प्यांवर भेटतील असं मी खोटं बोललो. गोविंदराव आदिकसाहेब दिसत नाहीत कालपासून ? भाऊ, बापूसाहेब काळदातेही बेपत्ता आहेत सकाळपासून— एक दोघं म्हणाले. थकलेत खूप. अमरावतीला असतील थोडी विश्रांती घेत. मी खोटंनाटं बोललो. खरं निराळंच होतं.

वीस । बारा । ऐंशी

पोहऱ्याहून चहा घेऊन सकाळी निघायचं. सकाळी सात वाजता. नागपूर अमरावती करून शरदराव पवार आले. राजारामबापू पाटील, एन्. डी. ह्यांच्याशी बाजूला नेऊन काही बोलत होते. नऊ वाजता खासदार यशवंतराव चव्हाण दिण्डीत सामील होणार होते. बाजूच्या शेतातून एक आमच्याच गावचा पोरगा घामाघूम धावत आला. मला बाजूला घेतलं. ही आमची पन्नासशंभर पोरं लवकर पुढे जाऊन रस्ता काटायचा म्हणून नदीवर आंघोळी, कपडे धुणं म्हणून पुढे निघाली होती. त्यांना तीन किलोमीटरवर अडवलं होतं. पाच पन्नास पोलीस,

वड अधिकारी, प्रचंड एस्. आर. पी. चा ताबा त्या डोंगरातल्या जंगलातील बंदीत नाकेबंदी करून होता. हजारो पोलीस आहेत. मी झुकांडी देऊन कसातरी इथपर्यंत उलटा पळत आलो. पुढं जाणं शक्य नाही. मी शरदरावांना, नेत्यांना बाजूला घेऊन सांगितलं. क्षणाचाही विचार न करता, न डगमगता शरदराव आणखी सर्व नेत्यांसकट दिण्डी घोषणा देत चांदूर रेल्वेच्या त्याच रस्त्यानं नेहमीप्रमाणे काढली. एक किलोमीटर अंतरावर सडकेवर थांबवली. सगळ्यांना कल्पना दिली गेली. पुढे दोन किलोमीटरवर अडविले जाणार आहे, शांतपणानं अटक करून घ्यावी. गडबड करू नये. सरकारनं हा चुकीचा निर्णय घेतला हे त्यांना दिण्डी सव्वीसला नागपूरला पोहचल्यावर कळणार आहे. आता संपूर्ण व्यवस्था व आडाखे वेगळे व नवीन राहतील. सरकारच्या सर्व हालचाली – गेल्या दोन-तीन दिवसांच्या विशेषतः अमरावतीच्या शेतकऱ्यांच्या, आपल्या शक्तीच्या – लक्षात आल्यावर त्यांनी जे जे ठरविले त्याप्रमाणे आम्हीही काही वेगळं ठरविलं. दिण्डी नागपूरला जाणारच. धुईखेडकरांजवळ (यवतमाळकर) आपली पाच हजारांची वेगळी दिण्डी आहे. काही शंकरराव गेडाम ह्यांच्याजवळ, डॉ. देकाते ह्यांचे जवळ पाच हजार लोक आहेत. ते सर्व तिकडेच थांबवून सव्वीसला कसे नागपुरात झेंडा फडकावणार ते त्यांनीच नीट ठरविले आहे. ते सरकारला गठणारे नाहीत. कॉम्रेड प्रल्हादराव कुरणे आणखी जळगावपासून थेट दिण्डीत असलेले त्यांचे सर्व साथीदार व इतर काही लोक ह्यांना दूरच्या देवळी मुक्कामाला परवा रात्री अकरा ते तीन वाजेपर्यंत आम्ही रवाना केलं. काही नेते मंडळी परवापासून नागपूरच्या सव्वीसच्या इतर बांधणीसाठी, आडाख्यासाठी कुठेतरी आम्ही पाठविली आहे. त्याविषयी फारसं बोलू नये.

पंचवीस हजारांच्या पुढील दिण्डी नागपूरला धडक देणार. सरकारनं यामुळे वाटेल ते धरण पोलिसांचं, कायद्याचं बांधू द्या. परवापासून मला काही खास सुगावा लागला म्हणून मी ही काळजी घेतली. पुढील आखणी चोख, नीट आहे. इ. थोडक्यात दिण्डीकरांना समजावून सांगितलं.

दिण्डीत सर्वच बड्या नेते मंडळीच्या सहवासात अधिक राहता आलं, परंतु शरदराव ह्यांच्या अनेक गोष्टी, शक्ती, चाणाक्ष राजकारणीपण, गृहखातं इत्यादी नव्यानं दिसलं. शेवटी शेवटी रात्रंदिवसाच्या खलबतासाठी एकटेपणी जायचं तेव्हा माझ्या सारख्या एखाद्याला घेऊन जात. बाकी कोणी नाही. एकदा सुदाम देशमुख होते. अमरावती नांदूरा वा कुठल्या कुठल्या गेस्ट हाऊसच्या स्वयंपाकघरापासून थबकून कान देणाऱ्या, चहा देणाऱ्या चपराशापर्यंत आमचं हळूच ऐकणारा साधा नोकर तिथला गुप्तचर आहे, गौडबंगाल पांघरून आलेला आहे हे फक्त शरदरावांच्या नजरेत येत होतं. मग नेत्यांमधला, तिथल्या लोकातला विषय लगेच बंद करून टाकणं किंवा इतरत्र पळणं.

फोन टॅप करताना दोन-चारदा पाहिलं. बाहेरून कुठं जावं तर एल्. आय्. बी. ची यंत्रणा इतकी मोठी, वेगवेगळी, की सुचेना. त्या पांढऱ्या नऊ नंबर गाडीवर, विरोधी पक्षनेत्याच्या गाडीवर व अन्य एक-दोन गाड्यांवर कडक पहारा व त्यामागे माग काढणं असायचं. हे सर्व रात्रीचं चालायचं. त्यात शरदराव इतर नेत्यांना, कार्यकर्त्यांना बसवून विशिष्ट ठिकाणी जायला सांगत. त्यांना वाटणार त्यातच शरदरावही आहेत. मी, शरदराव असे डोक्याला, तोंडाला थंडीचं मुंडास बांधून शाल इ. पांघरून संडास-मुतारीकडे एखाद्या तिकडच्याच कार्यकर्त्याची जीप गाडी किंवा काही ठेवलेलं असायचं त्यात स्वतः ड्रायव्हिंगला बसून शरदराव अज्ञात ठिकाणाच्या रेस्ट हाऊसात जाऊन मग तिथून आम्ही एसेम, मधू दंडवते, जॉर्ज, कर्पुरी ठाकूर वा इतर तिथं कुठे संधान साधून ठरवायचो. हे आमच्या गाडीकडे त्या अंधारातल्या जिपाडकडे पाहातही नसत. अशा अनेक गोष्टी.

गाणी-भजन आम्ही सुरू केलं तोपर्यंत खासदार यशवंतराव चव्हाण दिण्डीत आले. दिण्डीचा नेहमीचा जयजयकार झाला. काही क्षण जात नाही तोच समोरून सडकेनं, कडेनं पाचशे-हजार बंदुकधारी पोलीस, एस्. आर्. पी. पोलीस, अधिकारी कंटाळून आमच्याकडे चालत आलेले होते. मागच्या बाजूनंही तसंच कडं. घेरले गेलो. थोडा वेळ आम्हाला, आमच्यातल्या शौकीन मंडळींना हिंदी सिनेमातल्या डाकू माधोसिंग किंवा

अमिताभ–अमजदखानच्या काही सिनेमांतील प्रसंगांची त्या समयीही आठवण झाली. बडे पोलीस अधिकारी आले. काही कागद नेते मंडळींच्या हातात त्यांनी दिले. एकशे सदतीस । तीन. सकाळी सहा वाजता काढलेला अप्रकाशित, प्रेस इ. ठिकाणी न दिलेला पूर्वसूचना नसताना दहा वाजता सरळ आमच्या हातात. कोणीच काही प्रतिकार केला नाही. अर्धा पाऊण तास खलवतं, विचारविनिमय, पोलीस अधिकाऱ्यांशी बोलणं, विचार-पूस यात गेला.

सडकेच्या पूर्व बाजूला थोड्या अंतरावर छोटं खेडं होतं. पाच-पंचवीस घरांचं. आडरस्त्यात सडकेवर त्याच वेळी तिथल्या खेड्याचे पाच दहा प्रवासी लोक अडकून पडले. घाबरून गेले. एकदोघे अंग चोरून पळून त्या खेड्याकडे गेले. तसेच काही मागे रस्त्यानं पळू लागले. दिण्डी-करी पळणारे नव्हतेच हे पोलिसांना माहीत होतं. म्हणून त्यांनी ते काही लोक जाऊ दिले. त्याचाच फायदा उठवून शरदरावांना नुस्तं खुणवून, कपडे इ. काढून बनियन फाटकंविटकं करून उलटं मागे अमरावतीकडे त्याच लोकांमध्ये घुसून तेरा किलोमीटर पायी पळून, कुठे थोडी वाहनाची सोय साधून अरुण मेहता, शरद तसरे गेले होते. ताबडतोबीनं अर्ध्या तासात त्यांनी अमरावती, नागपूर, मुंबई, दिल्ली, पुणे इ. सर्व ठिकाणी प्रेसला व इतरत्र बातमी दिली. यशवंतराव चव्हाण इत्यादि नेतेमंडळी पोहराबंदीच्या जंगलात अटक होण्यापूर्वी बोलायला उभे राहात नाहीत तोवर दोन-तीन प्रेसच्या लोकांच्या गाड्या, फोटोग्राफर पाहून पोलीस अधिकारी थक्क होऊन पाहात राहिले. चौफेर तटबंदी, फार गुप्तपणे घाटलेली सरकारची काही योजना, तरीही हे असं घडलं.

यशवंतराव चव्हाण ह्यांचं पहिलं नाव, दुसरं शरदराव पवार, तिसरं राजाराम बापू पाटील, गणपतराव देशमुख, एन्. डी. पाटील, महानोर अशा क्रमानं नंतर दिण्डीतली लोकांची नावं-पत्ता इ. लिहून, सह्या करून महामंडळाच्या बसमधे बसून आम्ही सर्व बंदिवान झालो. यशवंतराव चव्हाणांना पत्रकार बसच्या खिडकीतून विचारीत होता, ‘पहिल्यांदा बसमधे बसलात का ?’ ते म्हणाले, स्वातंत्र्यानंतर पहिली

अटक व एस्. टी. महामंडळाचं उद्‌घाटन केलं तेव्हा तीसेक वर्षांपूर्वी बसमधे बसलो होतो.'

आमच्या आठ-दहा बस गाड्या. दहा-पंधरा पोलीस एस्. आर्. पी. गाड्या, दहा-पंधरा पोलीस अधिकाऱ्यांच्या गाड्या निघाल्या. महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, नेहरू, महात्मा गांधी यांचे अतिभव्य जिवंत वाटणारे असे चालते बोलते चित्रपुतळे आमच्या दिण्डीच्या अग्रभागी होते. स्वातंत्र्यानंतरही त्यांना पुन्हा अटक केली व एक-दोन मालट्रकमधे टाकून त्यांच्या नोंदी लिहिल्या. त्यांना आमच्या सगळ्यांच्या पेक्षा खालची वागणूक म्हणजे ट्रकमधे उन्हात जागा दिली. साहित्य, कागदपत्र, पिशव्या, इतर साहित्य सर्व जप्त करून ट्रकमधे इतरत्र जमा केलं. आम्ही मग गमती सुरू केल्या. उदाहरणार्थ, महात्मा गांधी डॉ. आंबेडकरांना काय म्हणत असतील? महात्मा फुले शेतकऱ्याचा आसूड हा लेख पुन्हा सुधारित लिहून मुख्यमंत्री ना. अंतुले ह्यांना समजेल अशा भाषेत लिहावा काय म्हणून नेहरूंना विचारतील. मग त्याचेच संवाद मोठ्यांदा आम्ही दोघंतिघं उत्स्फूर्त म्हणून सबंध एस. टी. डोक्यावर घेऊन हसत होतो. अमरावतीच्या बाहेरून गाड्या दुरून काढल्या गेल्या. तिथल्या जेलच्या दाराकडे घेतल्या, थोडं थांबून पुन्हा अमरावतीबाहेर नागपूर रोडकडे धावल्या, आम्ही पाणी प्यायला मागितलं, जेवायला मागितलं. दोन वाजले असावेत. जवळ काहीच नाही.

नागपूर रस्त्यावरले लोक येताना व जाताना भेटले. अमरावती शंभर टक्के बंद केल्याचं कळलं. अटक केल्यामुळे वातावरण अतिशय तंग असल्याचं कळलं. अधिकाऱ्यांना, कलेक्टर, पोलीस अधिकारी ह्यांना नेत्यांनी विनंती केली की इथंच आम्हाला ठेवावं. किंवा काय ठरवलं आहे ते सांगावं. ते निश्चित काहीच सांगत नव्हते. कायद्याप्रमाणे नजीकच्या कोर्टात दाखल करावं लागेल. तुम्ही अजून विचार करा इत्यादि सांगितलं पण ते ठामपणे सांगत की नागपूरला गेलं पाहिजे. हेच बरोबर. गाड्या अतिशय हळूहळू २५।३० च्या वेगानं नेत. मधेच बंद करीत.

रस्त्यानं बसमधे आमचे दिण्डीकरी शेतकरी व रस्त्याजवळील कास्तकार इतर प्रचंड घोषणा देत गर्जत होते. सबंध रस्ताभर रस्त्यानं.

नागपूरच्या बाहेर सायंकाळी पुरी-भाजी बांधलेलं पॅकेट प्रत्येकाला खायला दिलं. थोडंफार पाणी मिळालं. पुढे नागपूर शहराच्या बाहेरच्या रस्त्यानं भंडाऱ्याकडे घेऊन गेले. त्या रस्त्यानं प्रचंड बंदोबस्त व गाड्यांचा ताफा. आमच्या आरोळ्या, घोषणा, गिल्ला. ड्रायव्हरला सांगितल्यावर तो गाडी ट्रॅफिक आहे दाखवून बंद करीत असे किंवा फार फार हळू चालवी, कारण तोही शेतकऱ्याचा मुलगा होता. आमच्या विषयी त्याला ओढ होती. बसजवळ त्वरित लोक बोलावून आम्ही दोन पाच ओळींच्या चिठ्ठ्या नागपुरात योग्य ठिकाणी माणसांना निरोप देऊन पाठविल्या. काही फोन मुंबई-दिल्लीलाही सांगितले. इतर वृत्तसंस्थांना पाठविले.

पोलीस अधिकारी ड्रायव्हरला दाटत त्यावेळी तोही गाडी अजिबात कंडिशनमधे नाही. तुम्ही साहेब चालवून बघा. माझ्यावर जबाबदारी आहे इ. सांगून त्याची बोळवण करायचा. पुढचा भंडाऱ्याचा रस्ता नीट नाही. धूळ, पुलाचं काम, खड्डे. कुठे नेताहेत हे माहीत नाही. गाड्या थोड्या थोड्या अंतरावर थांबविण्याचे आदेश कुठूनतरी येत. भंडाऱ्याहून पुढे फार तर गोंदिया किंवा नंतर सांगू. आठ नऊ वाजता कसेबसे भंडाऱ्याला पोहोचलो तिथे पंधरा दिवसांच्या रिमांडसाठी मॅजिस्ट्रेटसमोर नेऊन चंद्रपूरकडे रात्रीच पाठविणार असं कळलं. जेवणाचं फोननं कळवलेलं होतं गोंदियाला: म्हणजे इथं नाही.

नागपूरच्या रस्त्याबाहेरच्या निरोपांवरून मधेच रस्त्यात भंडाऱ्याला धावत येऊन डी. बी. पाटील, दत्ता पाटील, ग. प्र. प्रधान, दत्ता मेघे, गोविंदराव वंजारी, मोगल, सूर्यभान गडाख, पिंटो, जगन्नाथराव जाधव, निहाल अहमद, पन्नालाल सुराणा, धर्मवीर सिन्हा भेटून पुन्हा नागपूरकडे निघून गेले. भाऊ दलाल आणखी त्यांच्या साथीदारांची खूपच घालमेल, धावाधाव त्यांच्याच भंडाऱ्यात आमच्यासाठी सुरू झाली. भंडाऱ्याच्या रेस्ट हाऊसला जेलचं लेबल लावलं, त्यामुळे तिथं सपत्नीक आलेले मंत्रिमहोदय डॉ. हिरे ह्यांना त्वरित निघून जावं लागलं: मार्केट कमिटीच्या यार्डात व दोन तीन लोकांच्या इमारतीसमोर सर्व कैदी बसलेले, पडलेले: यशवंतराव चव्हाणांना रेस्टहाऊसच्या जेलमधे टाकलं: गणपतराव

देशमुख, शरदराव, राजाराम बापू सर्व तिकडे मॅजिस्ट्रेटसमोर उभे राहिली. गणपतराव देशमुख खरे वकील: गणपतरावांनी वकिली सुरू केली. मॅजिस्ट्रेट व त्यांची कायद्याची जुगलबंदी सुरू झाली. कायद्याचा कीस, तर्कशुद्ध पुरावे इत्यादी..

त्याच गर्दीत एक निरोप घेऊन धावत कलेक्टरसाहेब आले: खा. यशवंतराव चव्हाण साहेबांना अटकच केलेली नाही, ते मुक्त आहेत. नागपूरला त्यांना पाठविण्याची सर्व जय्यत व्यवस्था आम्ही केली आहे. चव्हाणसाहेब म्हणाले, मग मला एवढे हेलपाटे घालून एकशे दहा मैलांवर आणलं कसं ? फारच गमतीचं सगळं चालू आहे. दिल्लीबिल्लीकडून काही निरोप, सांगावा असेल.

आम्हाला काहीच कळेना. इकडे पुन्हा कोर्ट मॅजिस्ट्रेट साहेबांनी सर्व पोलीस अधिकारी सरकारी वकील, पोलीस प्रॉसिक्युटर इ. व गणपतराव देशमुखांचं समर्थन ऐकून घेऊन कायद्याचे आधार कोट करून अमरावतीजवळ कोर्टात जिथं अटक केलं तिथं परत घेऊन जायचा निकाल दिला व पोलीस अधिकाऱ्यांवर ताशेरे झाडले. त्यांच्याकडचं काम झटकूनच टाकलं.

अमरावतीचं ते स्वागत, दिण्डीप्रेम. तिकडे नेणं अवघड. ते चक्रावले. मग काहीबाही सांगत : शेतीविषयक भूमिका व शांतपणानं जरी आजवर हे सज्जन लोक आले असले तरी अशी भूमिका असणाऱ्यांपासून वाईट घडेलच याची खात्री सरकारला वाटल्यानं त्या सर्वांना ताब्यात घेणं जरुरी आहे. असं तो अधिकारी म्हणताच त्यावर ताडकन उठून न राहवून एन्. डी. पाटील उसळून म्हणाले : आपण फारच बरोबर करताहात अगदी योग्य: हे वर्तमानपत्र बघा. तेही सरकारच्या बाजूचं आहे. शेतकऱ्यांच्या संबंधी काल मुंबईत शेतकऱ्यांच्या ह्याच भूमिकेसंबंधी बाजू उचलून धरून शेतकऱ्यांचे पाईक राष्ट्रपती नीलम् संजीव रेड्डी बोलले. रेडिओला आले. ह्या इसमास आपल्या धोरणाप्रमाणे का बरे अद्याप अटक केलेली नाही ? उद्या परवा तेवढं जरूरीनं आधी करा. आणि त्यावर आमच्या मॅजिस्ट्रेटच्यासकट एकच प्रचंड हशा पिकला.

रात्री जेवण मिळालं. सर्व शांतपणानं झोपलो.

दुसऱ्या दिवशी एकवीस तारखेला पुन्हा सकाळी निघून आल्या-मार्गानंच लोकांचे हातजोडले नमस्कार घेत चांदूर रेल्वे ह्या तालुक्याच्या गावी अमरावतीजवळ. तिथं कडेकोट बंदोबस्त. बंदूकधारी भयभीत करणारा पोलीस बंदोबस्त. प्रत्येक फुटावर. त्यापेक्षाही पाचपंचवीस मैलात जमेल तसे येऊन गर्दी केलेली उत्स्फुर्त शेतकरी जमावाची गर्दी. कुठल्याही स्थितीत न आटोपता येणारी. हातातली नसलेली. आरोळ्या, घोषणा, जयजयकार. भयानक भीती वाटावी असे सर्व भयग्रस्त.

चांदूर रेल्वेच्या मॅजिस्ट्रेटसमोर प्रगाढ शांततेत सर्व गढलेले. काय निकाल लागेल याचा तास दीड तास सोडा पण शेवटपर्यंतही अंदाज येईना, असं सर्व कायदे कानूनच्या जुगलबंदीत चाललेलं. दिण्डीकरी शेतकऱ्यांच्या बाजूनं आमदार बॅ. बी. एन. देशमुख ह्यांनी अत्यंत मोलाची कामगिरी बजावली. दीर्घकाळ लक्षात राहावी. मॅजिस्ट्रेट साहेबांनी झाल्या सर्व घटना, गोष्टी, नोंदी, कायद्याचा निःसंदिग्ध आधार घेऊन दिण्डीचा इतिहास हा लोकशाहीचा, त्यांचा शेतकरी म्हणून अग्रहक्क, शांततापूर्ण दिण्डीचं सरळ आंदोलन नमूद करून राज्य-शासनाच्या दडपशाहीला जबरदस्त अंकुश ठोकला व विनाअट दिण्डी-करांना मुक्त करण्याचा निकाल दिला.

अशा पद्धतीचा निकाल लागूनही बाहेरच्या व दिण्डीतल्या लोकांच्या चैतन्याला आवर घालणं आम्हाला कठीण गेलं. मग एन. डी. पाटील आणखी बरेच लोक तासभर तो उद्योग करीत होते. परन्तु निकाल उलटा लागता तर ? दगडाधोंड्यांनी पोलीस व्यवस्था विरुद्ध जनता जनार्दन असं प्रचंड युद्ध सुरू झालं असतं. कुणाचीही त्या वाईट गोष्टीला साथ नसतानाही. नागपूरपासूनची महाराष्ट्रातली इतर धावत आलेली मित्रमंडळी भेटली. रात्री पुढील खलबतं, दिशा ठरवली. तोपर्यंत बातमी आली की देवळीला कॉ. कुरणे आणि बबनराव ढाकणे ह्यांच्या नेतृत्वाखालील दिण्डीला अटक झाली. उद्या सकाळीच बुट्टी बोरीच्या वेगळ्या दिण्डीचं नेतृत्व खा. मधू दंडवते ह्यांनी करावं असं ठरलं आहे ते होणारच. एसेम जोशी परवा नागपूरच्या महत्त्वपूर्ण दिण्डीचं नेतृत्व करणार. पोलीसवाले अधिकारी एकमेकात हळू म्हणायचेः

एकूण ह्या दिण्ड्या आहेत तरी किती? पकडणार कुठल्या कुठल्या? काहीच पत्ता लागत नाही. दिण्डी सव्वीसला नागपूर राजधानीला धडक देणारच, तीही मोठ्या प्रमाणात-- अशी मुलाखत दिली.

नागपूर

बावीस ते सव्वीस

मुंबई, दिल्ली, महाराष्ट्रातल्या सर्व ठिकाणी प्रचंड हलचल. दोन्ही बाजूनं जिद्द. चॅलेंज, शक्तिपरीक्षा. डावपेच. मोडून काढू. इंचभरही दिण्डी पुढे जाऊ देणार नाही. नागपुरात व महाराष्ट्रात एकशे एकतीस एकशे एकावन्न कलम. गावोगाव तिथंच अटकाव. तालुका-जिल्हाभर दहशत. भीतीचं वातावरण. लोक वस्ताद. हजार गनिमी काव्याच्या पद्धतीनं नागपूरला सव्वीसला पोहोचले. काही पकडले गेले. काही सावध राहिले. आमदारनिवास, विरोधी नेत्यांचे बंगले येथील फोन गुप्तचर खात्याने कापलेले, टॅप होणारे. सर्वत्र अटकाव. आता पाच पाच तर सोडा, एक एक माणूस संशयित असेल तर पकडू अशी भूमिका. एक इंच पुढे जाऊ द्यायचं नाही. तसं झालंही. लोक खोट्या पत्रिका व नवरदेव घेऊन आले. जिल्हा तालुका पाणीपुरवठा योजना इ. प्रश्नांसंबंधी मंत्र्यांनीच बोलाविलं असं खोटंनाटं करून नागपुरात शिरले.

एसेम जोशी, राजेश्वर राव, कर्पूरी ठाकूर, देवीलाल, चंद्रजीत यादव, मृणाल मोरे, अहिल्या रांगणेकर कितीतरी देशातील खंदे नेते आले. देश–परदेशचे बडे वृत्तसंस्थांचे, प्रेसचे लोक आले. काही नेते पकडले गेले. काही भूमिगत राहिले. सव्वीसला ठीक बाहेर आले. दिण्डीकरांच्या बाजूनं कोर्टाचा निकाल मिळाल्यानं सर्वत्र सरकारची बदनामी झाली होती. त्यामुळे उलट चिडून काटेकोरपणानं कायदा अधिक हातात घेतला होता. गोविंदराव वंजारी, शिवाजीराव पाटील, (बुलढाणा), हरीभाऊ केदार, प्रभा राव, दत्ता मेघे, इ. अनेक नागपूर-विदर्भातल्या कार्यकर्त्यांची जिद्दही उलट वाढलेली दिसली.

परवाना भवन, त्यातील जेवणखाणं, साहित्य व माणसंही अटक

केल्यावर लॉज, आमदार निवास येथे अटकसत्र सुरू झालं. नागपूरकर लोकांनी दिण्डीकरांना ओळखदेख नसताना, माहिती नसताना आश्रय दिला. जेवणखाण दिलं. नागपूरजवळच्या खेडयांनी तुकडोजी महाराजांचं भजनी मंडळ, आश्रम, गुरुदेव सेवा मंडळ अशा ठिकाणी त्यांना सामावून घेतलं व सव्वीसला पाठविलं हे विशेष महत्त्वाचं. महाराष्ट्रात बंदोबस्त. नागपूर शहरात शेवटच्या दिवशी हे कुठनं एवढे पंचवीस–तीस हजार अवतरले ? माजी मुख्यमंत्री देवीलाल, कर्पूरी ठाकूर ह्यांना शरदराव पवारांच्या बंगल्याच्या कंपाऊंडबाहेरच प्रवेश करण्यापूर्वी अटक केली. ह्याच दिवशी दि ग्रेट पाणीवालीबाई मृणाल गोरे, प्रमिला दंडवते ह्यांनाही झाशीराणी पुतळ्याजवळून जाताना रस्त्यावर अटक करून टाकली. असे कित्येक खंदे नेते. तिकडे पुन्हा कुठे काढलेली एन. डी. पाटील व राजारामबापू ह्यांची दिण्डी. पुन्हा अटक. आणखी दोन दिण्ड्या पकडल्या. शहराजवळ. खूप उत्स्फूर्त व मोठ्या.

आदल्या दिवशी सकाळी मी, शरदराव पवार आणखी दोघं-तिघं आपल्या खोलीत होतो. अंगावर शाल पांघरून अभिनेते दिलीपकुमार आले. यवतमाळच्या कबड्डीच्या निमित्तानं. खरं म्हणजे दिण्डीसाठी. शरदराव ह्यांनी अत्यंत आत्मविश्वासानं दिलीपकुमारला सांगितलं : तुम्ही आता दिण्डींत येऊ नका उद्या. दिण्डी व्यवस्थित, भव्य असणार. तुमच्यामुळे लोक सव्वीसला वाढले असंही लोक म्हणतील. तुमच्या सदिच्छा आहेतच तेवढ्या पुरे. मीही दिलीपकुमार ह्याना बाजूस नेऊन सांगितलं: शक्य झाल्यास मुंबईहून जब्बार पटेल, निळू फुले आणखी डॉ. श्रीराम लागू इ. त्यांच्या मित्रमंडळींनाही सांगा, आता उद्यासाठी येऊ नये. ते येणार होते. येतीलही, तेवढं करा.

पंचवीस तारखेला गृह राज्यमंत्र्यांनी रात्री प्रेसला दिलं की दोन–तीन हजारांच्यावर लोक दिण्डीत असणार नाही व अटकेत पाचशे-सुद्धा लोक राहतील की नाही शंका आहे. आमचं शेवटचे मोर्चे बांधणं चालू. नागपूरकर मित्र आमदारांच्या सोबत सल्ल्यानं. तीनशे पंचवीस रूम नंबर माझी होती. साहित्यिक, चित्रपटवाले, विद्यार्थी, शेतकरी ह्यांचं येणं फार. शिवाय अरुण मेहता माझ्या खोलीवर म्हणून गर्दी

खूप असायची. आम्हाला आधीच निश्चित पकडणार हे माहीत म्हणून दोन-तीन दिवस आधी आम्ही दोघं अज्ञात ठिकाणी पसार झालो. 'लोकमत'च्या शेजारी. तिथून सर्व काही बांधणी, योजना, निरोप, रात्रीचं फिरणं. लोकमतमधे तसे काही मित्रही होते. जवळपास अकस्मात अचानक भेटत. पलिकडच्या तरुण भारतातले मित्र भेटत. पुष्कळ सोपं होत होतं.

कवी विठ्ठल वाघ ह्यांचे वडील गावाकडे वारले. त्यांना अटक केली आहे. जेलमधून सोडायला तरी सांगा. एवढं तरी पाळावं म्हणून प्रेस-वाल्यांना जेलमधली बातमी दिली होती. पण सरकार निर्ढावलेलं. सोडलं. ह्यांनी छापल्यावर मग उशिरा. दहा वाजून वीस मिनिटांनी झाशीराणी चौकात पुतळ्याजवळून मी स्वतः दिण्डी काढून निघणार आहे, असं पोलीस कमिशनर व प्रेसला रात्री शरदराव पवारांनी सांगितलं.

गुलाबराव पाटील, तुपे, विलासराव पाटील, सूर्यकांत पलांडे, हरीभाऊ महाले, चिमणराव कदम, इ. खास आमदारांनी सव्वीसलाच विधानभवन सभागृहात टाळवीणामृदंग इ. सकट शेतकरी दिण्डीच्या मागण्यांची सनद साक्षात मुख्यमंत्र्यांच्या, सरकारच्या हाती दिली व भजन सुरू केलं. सभागृहाच्या कंपाऊंडबाहेर त्याच दिवशी योजलेल्या शंभर दीडशे दिण्डीकरी शेतकऱ्यांनी दिण्डीच्या मागण्यांचा गजर सुरू केला व ती सनद लगेच भिंतींना डकवली.

त्याशिवाय दोन-दोन, तीन-तीन हजारांच्या दिण्ड्या नागपूरच्या वेगवेगळ्या भागात सुरू झाल्या, नागपूरकर कार्यकर्त्यांच्या विचार. विनिमयानं. ते फार बरोबर होतं. तसा मार्ग त्यांची दिला. त्यामुळे मुख्य सीताबर्डी रस्ता, झाशीराणी चौक इ. ठिकाणी पोलीस, एस. आर. पी. ताकद ऐनवेळी विभागावी लागली. पुन्हा नवे आदेश, नवा खलिता, धावाधाव, गोंधळ झाला. आमचीच नागपूरकर मंडळी दोन तीन आमच्याच पक्षाचे आमदार नुसतं आयडेंटिटीकार्ड दाखवून मी इंदिरा काँग्रेस-वाला, सरकारचा म्हणून सांगतो. त्या पलिकडच्या बाजूला फार मोठी दिण्डी निघाली. इथं काय करता ? स्टेशनकडे काही भानगड झाली.

ह्या फोनवर कळवा इ. उगाचच फोन इत्यादि करून नऊ-दहा वाजता सर्वत्र गोंधळ करून सर्व बंदोवस्त विस्कळीत केला.

शरदराव पवारांनी जे गाडी नंबर दिले होते त्या त्यांच्या गाड्या नऊ चाळीसच्या सुमारास दुसरेच साधारण कोणी खादीधारी तरुण पाठवून ठगवून टाकले व अकस्मात काही मिनिटांनी ते गोंधळात विस्कळीत विचारविनिमयात असताना ट्रक, ड्रम असं पुढे पाठवून त्यामागच्या साध्या गाड्यांतून व ट्रकमधले ड्रम सरकवून नेते पटकन उतरले. 'शेतकरी महाराज की जय' अशी जोराची घोषणा झाशीराणी पुतळ्याजवळ देऊन शरदराव, एसेम जोशी, जॉर्ज फर्नांडीस दहा मिनिटात पाच हजारांची दिण्डी पताका, सनद, महात्मा जोतिरावांच्या प्रतिमा घेऊन धुमधडाक्यात पुढे सीताबर्डी रस्त्यानं निघूनही गेले. त्यानंतर एक छोटी दिण्डी निघाली तिला छडीमार झाला, त्यात दत्ता मेघे इ. मंडळींना मार बसला.

पोलीस, एस्. आर. पी. पुन्हा गोंधळात असताना पंधरा मिनिटांनी कोणीही हिम्मत करत नाही अशा वेळी ठरल्याप्रमाणे मी, अरुण मेहता, जामखानवाला, पुण्याचे बापूसाहेब थिटे, अनंतराव पाटील, असे शंभरेक कार्यकर्ते झाशीराणी चबुतऱ्यावर उभे राहून गर्जलो. कडे, लोखंडी जाळ्या मोडल्या. पोलीस अधिकाऱ्यांनी शस्त्रं, काठ्या हाती घेतल्या, आम्हाला विनवलं. मी त्यांना सांगितलं : हात जोडून मीही तुमच्या पाया पडतो. कृपा करून अडवू नका. तुम्ही गोळी घाला, आम्ही थांबणार नाही. –आणि धडक मारून निघालो. तोपर्यंत फक्त पाच मिनिटात आम्ही महात्मा गांधी पुतळ्याजवळ पोहोचत नाही तर मागे संपूर्ण झाशीराणी चौक व लोकमत कचेरीपर्यंत पाच सात हजार जनता दिण्डीत कुठून कशी एकाएक आली ते आम्हालाही कळलं नाही.

मग उधाण आलं. सर्वांचं रक्त तापलं. पुन्हा एकदा रस्त्यानं मोठ्यांदा शाहीर अमर शेख ह्यांचं जुनं सत्तावनमधलं गाणं सुरू. जागा मराठा आम जमाना बदलेगा.' 'ही इतिहासाची पाने लिहिली आमुच्या रक्ताने' इत्यादी म्हणताच जोष आला. पुढील एस्. आर. पी. चा ठराविक रस्ता चुकवून मधल्याच सापडेल त्या बोळानं हमरस्त्यानं

आम्ही पहिल्या एसेम, शरदराव ह्यांच्या दिण्डीच्या गंगेत आमची गंगा मिळवून टाकली. स्टेशनजवळ तर अनंत गंगा. तिसरी एक मोठी दिण्डी आमच्या मागोमाग हजर.

कस्तुरचंद पार्कजवळ जिथं शेवटी सर्व मोर्चाची अडवणूक होते, तिथं पाहिजे त्या ठिकाणी दिण्डी स्टेशनजवळून आली. स्टेशनचे लोकही मग सामील झाले. सर्व दिण्डीकर नेते मंडळींची मनगटं, छाती, मान उंच ताठ झाली. फुलांचे हार, फुलं रस्ताभर लोक उधळत. पोलीस यंत्रणेकडून कृषी विद्यापीठाचे विद्यार्थी, कॉलेजातले तरुण विद्यार्थी आटोक्यात आणणं कठीण. पन्नालाल सुराणा, प्रतापराव भोसले, ईश्वरभाई जैन, मी सगळ्यांची समजूत घालीत बसलो. मग महात्मा ज्योतिरावांची प्रतिमा, शेतकऱ्यांच्या मागण्या, सनद, इ. संबंधी नेते मंडळींची भाषणं होऊन ती सरकारी अधिकाऱ्यांमार्फत देऊन पोच केली. एकदाची दिण्डी शेवटपर्यंत नेण्याची जिद्द पूर्ण झाली.

नंतर जिल्हावार नेत्यांच्या सोबत शांतपणानं सर्वांनी अटक करवून घेऊन बसगाड्यांनी शासनानं शहराबाहेरच्या दूरच्या मोकळ्या रानातल्या जेलमधे सोडण्याचं कार्य केलं. चार–पाच वाजेपर्यंत अशा पद्धतीनं पाच सहा हजार अटक करता आले. आमचे बसमधून गेलेले दिण्डीकरी रानातल्या मोकळ्या जेलमधे ओसाड ठिकाणी सोडल्यानं त्यांच्या सर्व बसची हवाच सोडून देत. अशा सर्व बसगाड्या पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या तिकडेच पंक्चर पडून. बातमी नाही. मग चार पाच वाजता कळल्यावर कंटाळून उरलेल्या हजारो लोकांना, आम्हाला अटक न करताच सोडून दिलं व घरी जायला हात जोडले. तेव्हा फार मोठा जयघोष आम्ही केला. रेल्वेमधून, बसमधून ऐनवेळी येणारे लोकही दिण्डीकरी म्हणवून घेत.

एक लंगडा माणूस शंभरेक लोकांना स्टेशनकडून घेऊन आला व आमदार दिलीप ढमढेरेंना शोधू लागला. मी पेपरात वाचलं म्हणून प्रेरणा झाली म्हणाला. शंभरांची दिण्डी आणली. आम्ही दोघा लंगड्यांची भेट घालून दिली. अशा गमती सर्वत्र. सायंकाळी सर्वांना थंडपणानं सोडलं. काही नेते मंडळीसोबत आम्ही जेलमधे. पोलीस कस्टडीत. तिथून

सुटताना शरदराव पवारांनी मनमोकळी मुलाखत दिली. प्रसन्न. मला विचारलं तेव्हा चार ओळी मी दिल्या, त्या तशाच अक्षरात सकाळी वृत्त-पत्रांच्या अग्रभागी ठळक आल्या–

रानमाळी एक झाल्या माणसांनी
हे उभे आभाळ आता पेटलेले.
मातिचा ह्या मरठ भरले राष्ट्र सारे
कास्तकारांच्या मुठींचे वज्र झाले.

REFBK-0023753